# प्रकरण ३ रे

# 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांची आशय सूत्रे

# प्रकरण - ३ रे

# 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांची आशय सूत्रे

## ३.१ प्रास्ताविक

जयंत नारळीकरांच्या आजपर्यंत काही ठराविकच कथासंग्रह आणि कादंबरी प्रसिध्द झालेल्या पाहावयास मिळतात. त्यांच्या लेखनाचे विश्व पृथ्वी आणि पृथ्वीबाहेरचे ग्रह, त्यावरील सजीवसृष्टी, यांच्यामध्ये होणारे दळणवळण अशाप्रकारचे आहे. त्यावरच त्यांच्या सर्व कादंबरी आढळून येतात. यावरून त्यांच्या कादंबरींचा आवाका रूढ मराठी कादंबरीपेक्षा फारच मोठा आणि वेगळा आहे हे लक्षात येते. संख्यात्मकदृष्टया त्यांच्या विज्ञानकथा व कादंबऱ्या अधिक नसल्या तरी गुणात्मकदृष्टया त्या चांगल्या प्रतीच्या आहेत. त्यांच्या बऱ्याच कथा वैशिष्टयपूर्ण आणि लेखक म्हणून वेगळे पैलू दाखविणाऱ्या आहेत.

नारळीकरांची लेखक म्हणून असणारी वैशिष्टये पूर्णतः लक्षात येण्यासाठी त्यांच्या कथांच्या आशयसूत्रांचा विचार होणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणात त्यांच्या प्रेषित आणि अभयारण्य या कादंबऱ्यांची आशयसूत्रे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

नारळीकरांचे लेखन हे वैज्ञानिक संकल्पनांचा आधार घेऊन केलेले आहे. त्यांच्या मानवाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्वतंत्र्य आहे. त्यांच्या दृष्टीकोनातील मानव हा एका प्रदेशापुरता मर्यादित नाही. तर तो वैज्ञानिक पातळीवरचा आहे. मानवतेबद्दलच्या त्यांच्या कल्पनाही फारच विस्तारित झालेल्या दिसतात.

डॉ. जयंत नारळीकर सांगतात - "वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे कार्यकारी भाव तपासणे. प्रत्येक कार्यामागे काहीतरी कारण असते, ते कारण शोधणे, समजून घेणे अन् त्याप्रमाणे वर्तन करणे महत्त्वाचे ठरते."[१] अर्थात हजारो वर्षापासून मानवाच्या मनात खोलवर रूजलेल्या या भावना सहजासहजी दूर होणार नाहीत. यांची जाणीव डॉ. जयंत नारळीकरांना आहे. त्यासाठी सर्वांनाच जागृत होणे गरजेचे आहे. आपल्या लेखनातून नारळीकर हाच आशय मांडताना दिसून येतात.

आज विज्ञान हा केवळ काही थोडया विचारवंतांच्या अभ्यासाचा विषय राहिला नसून, तो आपणा सर्वांच्या जीवनातला एक महत्त्वाचा घटक झाला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपल्या दिनचर्येत विज्ञानाचे पडसाद अनेक तऱ्हेने उमटतात ते आपण पडताळून पाहणे आवश्यक आहे. या पसाऱ्याचे प्रतिबिंब साहित्यातही उमटायला पाहिजे. पाश्चात्य देशांत ते उमटलेले दिसते. परंतु भारतीय साहित्यावर अजून विज्ञानाचा प्रभाव तितकासा पडलेला दिसत नाही. विज्ञान साहित्य म्हणजे केवळ विज्ञानकथा किंवा कादंबऱ्याच नव्हे तर त्यात लेख, चर्चा, नाटके, प्रहसने, काव्य अशा अनेक साहित्यप्रकारांचा समावेश करता येतो. सध्याच्या सामाजिक जीवनात विज्ञान कुठे आणि कसे येते आणि पुढे त्याचे स्वरूप कसे असेल, वैज्ञानिक कसे असतात, कसे वागतात, त्यांच्या लेखनापाठीमागील महत्त्वाच्या भूमिका काय आहेत? सामान्य लोकांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे ते कशा प्रकारे देतात, त्यामागची शास्त्रीय कारणे काय असतात, इत्यादी विषय साहित्यिकांनी हाताळावेत असे नारळीकरांना वाटते आणि त्या अनुषंगाने त्यांनी आपले लेखन केले आहे.

## ३.२ 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांची रचना

प्रेषित आणि अभयारण्य या कादंबऱ्यांची चिकित्सा करताना प्रामुख्याने दोन्ही कादंबऱ्यांचा आशय समजावून घेऊन त्या आशयाची संरचना तपासने आवश्यक आहे. कोणत्याही कलाकृतीची मांडणी करताना त्यातील आशयाला अनन्यसाधारण महत्त्वाचे स्थान असते. कलाकृतीची व्याप्ती त्या कलाकृतीतील आशयावर अवलंबून असते. प्रत्येक कलाकृतीत काही ना काही कथानक असते. ते मांडताना लेखकाने कोणते आशयसूत्र मांडलेले आहे हे त्या आशयावरून समजते. 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या कादंबऱ्यांमध्ये लेखकाला काय सांगायचे आहे, त्यामधील प्रसंग त्याने कसे मांडलेले आहेत. हे समजण्यासाठी आशय हा घटक महत्त्वपूर्ण ठरतो. म्हणून प्रेषित आणि अभयारण्य या कादंबऱ्यांचा आशय आणि संरचना तपासून पाहणे आवश्यक ठरते. म्हणूनच प्रस्तुत प्रकरणात कादंबऱ्यांचा आशयसूत्रांच्या अनुषंगाने त्यामध्ये असणाऱ्या व्यक्तिचित्रणांचा, विज्ञान आणि वैज्ञानिक जाणीवांचा विचार या प्रकरणात मांडण्यात आलेला आहे.

## १. 'प्रेषित' कादंबरीची रचना -

'प्रेषित' कादंबरीच्या केंद्रभागी असलेल्या 'सायक्लॉप्स' हा सध्या प्रकल्परूपाने शास्त्रज्ञांच्या विचाराधीन आहे. 'पृथ्वीपलिकडे जीवसृष्टी प्रगत स्वरूपात असेल का?' ह्या प्रश्नांची शहानिशा करण्यासाठी या प्रचंड दुर्बिणीची कल्पना व्हूजेट पॅकार्ड कंपनीतील बर्नर्ड ऑलिव्हर यांच्या डोक्यातून निघाली. मोठी राष्ट्रे राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली शस्त्रास्त्रांवर दरवर्षी जितका पैसा खर्च करतात त्याच्या अल्पांशात सायक्लॉप्स बांधून होईल, परंतु पैशाच्या अभावी हा प्रकल्प कागदावरच आहे. जयंत नारळीकरांनी भविष्याचा वेध घेत सॉयक्लॉप्सचे काम पूर्ण केले आहे, अशी कल्पना करून कादंबरीचे लेखन झाले आहे. या कादंबरीची सुरूवातच सायक्लॉप्सपासून होते व शेवटही सायक्लॉप्सजवळच होतो.

नारळीकरांनी या कादंबरीची रचना एकूण वीस प्रकरणामध्ये केलेली आहे. कादंबरीची सुरूवात ही सायक्लॉपप्स या दुर्बिणीपासून होते. या सायक्लॉपप्ससारख्या वेधयंत्राचा वापर जॉन प्रिंगल या शास्त्रज्ञाने पृथ्वीपासून दूर अंतराळात एखादी जीवसृष्टी अस्तित्वात आहे का याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्याला त्याच्या या कामात त्याचा एक मित्र 'पीटर' मदत करीत असतो. हे दोघे मिळून सायक्लॉप्सवरून बेकायदेशीरपणे अंतराळात अनेक संदेश पाठवण्याचे काम करत असतात. त्यातून त्यांना परग्रहावर एखादी नवीन जीवसृष्टी अस्तित्वात आहे का हे पाहयचे असते. पण दुर्दैवाने ज्या दिवशी जॉनला या परग्रहावरील जीवसृष्टीविषयी माहिती मिळते. त्याच रात्री त्याचा अपघात होतो आणि त्याचा मृत्यू होतो. आपल्याला मिळालेली माहिती पीटरला देण्यापूर्वीच तो मृत्यूमुखी पडतो. त्याचदिवशी सायक्लॉपप्सच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनाही जॉन काहीतरी बेकायदेशीर काम करत आहे याची खात्री होते. त्यामुळे त्याने शोधलेली सृष्टी आणि त्याच्याविषयीची माहिती ही अर्धवट अवस्थेत राहते. पण पृथ्वीवरून संदेश पाठवण्याचे काम पूर्ण झालेले असते. त्या संदेशाच्या उत्तरार्थ तिथून एक यान निघालेले असते. ही गोष्ट पृथ्वीवर कोणालाही माहित नसते.

पुढे काही वर्षांनी सातारा ते कराड नॅशनल हायवेवरती सुधाकर नाईक या व्यक्तीला एक लहान मूल बेवारस स्थितीत सापडते. या मुलाची वैद्यकीय तपासणी

करून नाईक दांपत्य त्याला कायदेशीर दत्तक घेते. त्यांना स्वत:चे मूल नसते. या मुलाचे नाव आलोक ठेवले जाते. याला तपासणाऱ्या डॉक्टरांचे मत असते की, पृथ्वीवर एवढ्या अचाट बुध्दिमत्तेचे बालक प्रथमच पाहण्यात आले आहे. आलोक आपल्या या अचाट बुध्दिमत्तेमुळे आपल्या पालकांना नेहमीच आश्चर्यचकित करीत असतो.

आलोक जेव्हा पाच वर्षांचा झाला तेव्हा २०३० साल होते. त्यावेळीच्या शाळा म्हणजे घरबसल्या असत. आलोक ज्या शाळेत शिकत होता त्या शाळेत दहा लाख मुले शिकत होती. पहिल्याच दिवशी गुरूजींनी घातलेले उदाहरण कमी वेळात आणि एकट्या आलोकने सोडवून मिश्राजींचे मन जिंकले होते. त्या दिवसापासून मिश्राजींची आलोकवर जास्त नजर असे. मिश्राजी त्याला वेळोवेळी वेगवेगळे प्रश्न देऊन त्याच्या बुध्दिला चालना देण्याचे काम करत. पुढे वयाच्या दहाव्या वर्षी वर्ल्ड टॅलेंट स्कीम या परीक्षेत आलोकला यश मिळते व तो चंद्रावर सहलीला जातो. तिथे गेल्यावर त्याला वेगळे असे काही जाणवत नाही. तिथे सॅन्ड्रा नावाच्या मुलीबरोबर त्याची मैत्री होते.

पुढे आलोकला सर्वांच्या मताने स्पेस ॲकॅडमीत पाठविले जाते. स्पेस ॲकडमीतही आलोक पहिल्याच दिवशी सर्वांना हैराण करतो. त्याच्यानंतर काही दिवसांनी सॅन्ड्राला आलोक विशिष्ट अशा स्वप्नात गुंतलेला दिसतो. आपला हा अनुभव ती चेंगला सांगते. त्यावरून चेंग डॉक्टर साळुंखेंना भेटतो. डॉ. साळुंखे चेंग व सॅन्ड्राची मदत घेतात व आलोक हा जॉन प्रिंगलनी पाठवलेल्या संदेशाच्या उत्तरार्थ आलेल्या यानातील एकमेव परग्रहवासी असतो. हे सिध्द होते. आलोक आपल्या ग्रहावर संदेश पाठवतो. त्यासाठी तो सायक्लॉप्सची मदत घेतो. याठिकाणी कादंबरी संपते. अशाप्रकारे 'प्रेषित' या कादंबरीचा आशय आपल्याला पाहायला मिळतो. यामध्ये भविष्याचा वेध घेत परग्रहावर खरचं जीवसृष्टी अस्तित्वात असेल आणि आपल्या हाकेला तिथून ओ येईल असे मत नारळीकरांनी व्यक्त केले आहे. यामागची सत्यता पडताळून पाहली असता आपण काही पुराव्यांच्या आधारे नारळीकरांची विधाने असत्य ठरवू शकत नाही.

सामान्यत: कादंबरी या प्रकारामध्ये आपल्याला कादंबरीच्या रचनेत सुसंगतपणा दिसून येतो. कादंबरी ही काल्पनिकतेवर आधारित असते. तरीही तिचे वाचन करत असताना त्यामध्ये एकप्रकारची सलगता व वास्तवता आपल्याला दिसून येते. लेखक

कल्पनेच्या सहाय्याने कादंबरीतील नायकाच्या अंर्तमानातील भाव-भावना व्यक्त करत असतो. तसे पाहायला गेला तर वास्तव आणि कादंबरीचा आशय यांचा थेट संबंध नसतो. तरीही कादंबरी वाचत असताना असे लक्षात येते की, काही घटना आपल्या समोर घडत आहे. वास्तव आणि काल्पनिकता यांच्यामध्ये आपल्याला साम्य दिसून येते. प्रेषित या कादंबरीची रचना काहीशी अशीच दिसून येते. याठिकाणी कादंबरीचा नायक 'आलोक' हा वास्तव जीवनाचा प्रतिनिधी म्हणून काम करीत आहे. नारळीकरांनी यामध्ये भविष्याचा विचार करून परग्रहावरील सृष्टीविषयी आपले मत मांडले आहे. ही कांदंबरी संपूर्णता काल्पनिक आहे. परंतु, कादंबरी वाचत असताना आपल्याला या सर्व घटना समोर घडत आहेत. असे वाटते. एका ठिकाणी असा उल्लेख आला आहे की, आलोकने एक पांढरा टी-शर्ट काढून दिला. त्यावर एका संस्कृत सुभाषिताची दुसरी ओळ लिहिलेली होती:

"एक: चंद: तमो हन्ति न तु तारागण: शतम्।।"[२](प्रेषित,पृ.४२)

चंद्राची महती सांगणारे हे सुभाषित टूरिजमसाठी वापरण्यात आले आहे. याबद्दल सुधाकरला कौतुक वाटले. पण सुभाषिताची पहिली ओळ आलोकने सार्थ केली असे त्याने मनोमन म्हटले. याठिकाणी आपल्याला दिसून येते की, नारळीकरांनी केवळ पृथ्वीवरच नाही तर चंद्रावरही संस्कृतीला महत्त्व दिले जाते, हे दाखवून दिले आहे. काल्पनिकपणे हे चित्र रंगविले आहे. पण जणू काही हे आपल्या समोर घडत आहे, असे वाटते.

या कादंबरीमध्ये ठिकठिकाणी नारळीकरांनी प्रायोगिकता वापरलेली आहे. कल्पनेला शास्त्राची जोड देऊन त्यांनी कादंबरीतील रोमांचकता आणखीनच वाढवलेली आहे. नारळीकरांनी आपल्या कादंबरीमध्ये वेळोवेळी वास्तवतेला शास्त्रीय जोड दिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबरीत लिहिलेल्या काल्पनिक प्रसंगांनासुध्दा वास्तवतेची किनार आहे की काय असा भास होतो. घटना डोळ्यासमोर उभ्या राहतात. प्रेषित या कादंबरीत एके ठिकाणी ते म्हणतात, "आलोकचं आताचं वय चार महिन्यांच्या आसपास आहे हे त्याच्या शारीरिक वाढीवरून मी सांगू शकतो. माझा अंदाज फार तर एका आठवडयानं चुकू शकेल. पण त्याच्या मेंदूची एकंदर कार्यक्षमता पाहिली तर ती दोन वर्षाच्या मुलाच्या मेंदूसारखी आहे. तो बोलत नाही अजून, पण त्याचे कान विलक्षण आहेत. अगदी मंद आवाज त्याला ऐकू येतो. त्याचं नाक वास घेण्यात तीक्ष्ण आहे. पण

त्याहूनही प्रभावी आहेत त्याचे डोळे. तुम्हांला विश्वास बसणार नाही, पण त्याला रंग ओळखता येतात! इतकंच नव्हे तर महिन्याभरात तो अक्षरं ओळखू शकेल....”[3] (प्रेषित, पृ. २३) या विधानातून असे दिसून येते की, ही सर्व माहिती फक्त लहान मुलाला पाहून शास्त्राच्या आधारे सांगितली आहे.

जयंत नारळीकरांच्या पात्रांची कृती ही भविष्यकाळात घडून येणाऱ्या यांत्रिक प्रगतीचे दयोतक आहे. हे सांगत असताना कादंबरीकाराने प्रगत माणसाचा संशोधनाच्या तुलनेने पृथ्वीवरचा मानव किती मागे आहे हे दाखविलेले आहे. परंतु या यांत्रिक मानवाला देखील निसर्ग जवळचा वाटतो. तो यंत्रांना कंटाळतो. हे आपल्याला पुढील विधानातून लक्षात येते. “असं म्हणू नकोस सँड्रा! तू मला जवळून पाहिलंयस. माझ्यासारखेच माझे ग्रहबंधू आणि ग्रहभगिनी शांत स्वभावाचे आणि प्रगल्भबुध्दिचे आहेत - मी आत्मस्तुती करत नाही, वस्तुस्थिती सांगतोय. आमच्या ग्रहावर रोगराई नाही; दीर्घायुष्य आहे. हिंसाचार नाही. तुम्हांला त्रास देणारी झुरळं आणि इतर किडे आमच्या ग्रहावर होते त्यांचं आम्ही निर्मूलन केलं, तेही निसर्गाचा समतोल बिघडू न देता! सर पीटर, तुम्ही शास्त्रज्ञ आहात. तुमच्यापुढं न सुटलेले अनेक प्रश्न आहेत, मूलभूत स्वरूपाचे आणि लोककल्याणाचे...

“रीमान हायपॉथिसिस बरोबर आहे की चूक हे अदयाप तुमच्या गणितज्ञांना माहित नाही. भौतिकशास्त्राच्या मूलभूत क्रियांचं एकसूत्रीकरण कसं करायचं ह्या प्रश्नावर आइन्टाइनपासून गेली शंभर वर्षे इथं संशोधन चालू आहे. गेल्या शतकात तुमचे खगोलशास्त्रज्ञ ठामपणं सांगायचे की विश्वाची उत्पत्ती महास्फोटातून झाली. आज त्यांच वंशज विश्वाचं कोडं खरोखर किती अवघड आहे याची जाणीव ठेवून आहेत. जीवसृष्टी होते कशी? तिचे मूलघटक कोणते? कॅन्सरवर रामबाण उपाय कोणता? मेंदूत बाहेरून माहिती कशी भरायची? ह्या प्रश्नांची समर्पक उत्तरं एका झटक्यात मिळतील तुम्हांला आमच्या शास्त्रज्ञांकडून...”[४](प्रेषित, पृ.१२४) याठिकाणी आपल्याला असे दिसून येते की, पृथ्वीवरचा मानव अजूनही किती मागास आहे. त्याला अजून प्रगतीची अनेक शिखरे गाठायची आहेत. नारळीकरांनी विज्ञानाचे महत्त्व पटवून देत असताना त्याचा समाजमनावर होणारे परिणाम देखील दाखवला आहे. प्रचलित गोष्टीतील विज्ञानावर

आधारितच विज्ञान साहित्य असतं असं नाही. इतर साहित्यिकांप्रमाणेच विज्ञानसाहित्यकार आपल्या कल्पनाशक्तीला वाव देणारं, भविष्याचा वेध घेणारं, विज्ञान साहित्य जन्माला घालतो. त्या विज्ञान साहित्यातून वर्णन केलेल्या प्रगतीचा मानवी भावना, समाज जीवन यांच्यावर परिणाम होत असतो.

## २. 'अभयारण्य' या कादंबरीची रचना

'अभयारण्य' ही कादंबरी एकोणीस प्रकरणामध्ये विभागली आहे. त्यामध्ये पृथ्वीवर परग्रहवासी येवून आपल्या पृथ्वीचे निरिक्षण करतात आणि आपल्या चूका दाखवून देतात. जणू काही पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी ते आलेले आहेत. अशाप्रकारची मांडणी या कादंबरीत केलेली आहे. नारळीकरांनी पृथ्वीवरील मानवाला अजून किती प्रगती करावी लागणार आहे, केलेल्या प्रगतीचा मानव कशाप्रकारे गैरवापर करीत आहे हे यातून दाखविले आहे. कादंबरीची रचना एकूण एकोणीस प्रकरणात केलेली असली तरी त्यामध्ये एकसंगती आपल्याला दिसून येते. प्रत्येक प्रकरण एक दुसऱ्याला वैचारिक दृष्ट्या जोडलेले आहे. हे लक्षात येते. अत्यंत साध्या, सोप्या भाषेत कादंबरीची रचना केलेली आहे.

तंत्रज्ञानाचा अविचारपूर्वक केलेला वापर, आपले रक्षण करणारे ओझोनचे कवच भेदले जात आहे, याबद्दलची उदासीनता, आपले मर्यादित हितसंबंध जपण्यासाठी संपूर्ण जीवसृष्टीला मारक ठरणाऱ्या अण्वस्त्रांची वाढ, आदी गोष्टी या सर्वांच्या चिंतेतून या कादंबरीची रचना केलेली दिसून येते. सर्वसामान्यत: कादंबरी या प्रकारामध्ये आपल्याला कादंबरीच्या रचनेत सुसंगतपणा दिसून येतो. कादंबरी ही काल्पनिकतेवर आधारित असते. तरीही तिचे वाचन करत असताना त्यामध्ये एकप्रकारची सलगता आपल्याला दिसून येते. लेखक कल्पनेच्या सहाय्याने कादंबरीतील नायकाच्या अंर्तमनातील भाव-भावना व्यक्त करत असतो. तसे पाहायला गेला तर वास्तव आणि कादंबरी यांचा थेटपणे संबंध नसतो. तरीही कादंबरी वाचत असताना असे दिसून येते की, ज्या काही घटना आपल्या समोर घडत आहे. त्यामध्ये वास्तवता आणि काल्पनिकता यांच्यामध्ये आपल्याला साम्य दिसून येते. कादंबरीच्या सुरूवातीच्या प्रकरणात आलेला उल्लेख आपल्याला वास्तवात ही घटना समोर घडत आहे याचा आभास देते. "होय, हाच तो ग्रह!

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आहे खरा आपल्याच ग्रहासारखा. झाडं, पर्वत, पाणी आदी गोष्टींनी आच्छादलेला. पण दमनका, आपल्याला आधी ग्रहाचं वायुमंडल तपासून पाहायचं आहे."[५] (अभयारण्य, पृ.२.) यातून असे दिसून येते की आपल्या समोरच या घटना घडत आहेत.

कादंबरीच्या पहिल्या प्रकरणात आलेल्या दोन व्यक्ती जणू काही पृथ्वीचे निरिक्षण करण्याच्या उद्देशाने आल्या आहेत, असे दाखविले आहे. आगीचा लागलेल्या शोध या साध्या घटनेतून लहान मुलाच्या माध्यमातून दाखविला आहे. थंडीचा प्रकोप सहन होत नसताना आपल्या आजोबांच्या तोंडून ऐकलेल्या अज्ञात प्रकाशाच्या शोधात हा मुलगा जातो. त्याच्यासमोर अचानक दोन दगड एकमेंकावर आदळतात आणि त्यातून ठिणग्या उडतात. त्यातूनच आगीचा शोध लागतो.

त्यानंतर धूमकेतू काही महिन्यांतच पृथ्वीजवळून जाणार असतो. त्यामुळे पृथ्वीच्या वातावरणात आणि समुद्रात खळबळ माजेल. ध्रुवप्रदेशाचा बर्फ वितळायला लागेल. त्यातून वादळे होतील, जलप्रलय होईल. त्याचा सामना पृथ्वीवासीयांना करावा लागेल असा संदेश आलेल्या व्यक्ती देत असतात. पण संदेश देत असताना त्या लोकांच्या समोर येत नाहीत. त्यामुळे ही आकाशवाणी वाटते. नारळीकरांनी याठिकाणी लोकांच्या मनातील अंधश्रध्दा दाखविली आहे. झालेल्या आकाशवाणीवर लोकांचा विश्वास नसतो.

"धूमकेतू म्हणजे आकाशातून झडप घालणारा राक्षस आहे......नव्हे, तो सूर्यालाच ग्रासणार आणि मग जगभर सतत अंधारच अंधार..... धूमकेतूची नजर वाईट म्हणून पृथ्वीवरची महत्त्वाची माणसे मृत्युमुखी पडणार...... हा शेपूटवाला प्राणी रोगराई पसरवणार.. इत्यादी, इत्यादी. आणि त्या अफवांमुळे लोक घाबरून जादूटोणा करणाऱ्यांच्या नादी लागले आणि त्यांनी सांगितलेले विचित्र, अघोरी उपाय अमलात आणू लागले."[६] (अभयारण्य, पृ.२) या विधानातून डॉ. नारळीकरांनी लोकांच्या मनातील अंधश्रध्दा दाखवून दिलेली आहे. नारळीकरांनी अतिशय चांगल्या प्रकारे शास्त्रीय आधार देवून या अंधश्रध्दा मिटवण्याचा प्रयत्न केला आहे.

कादंबरीमध्ये वास्तवतेतील घटनांचा आधार घेवून त्यामध्ये काल्पनिकता रंगविलेली असते. त्यात काल्पनिक गोष्टी लोकांच्या मनावर रूजविण्याचा प्रयत्न लेखक

करत असतो. पण याठिकाणी नारळीकरांनी काल्पनिक कादंबरी लिहिली असली तरी त्यामध्ये भविष्याचा विचार दिसून येतो. भविष्यात येणाऱ्या संकटांची चाहूल त्यामध्ये दिसून येते. यांत्रिकीकरणाच्या फायदयांच्या आहारी जाऊन ते आपली नेहमीची सावधगिरी बासनात गुंडाळून ठेवतात. याचा विचार याठिकाणी केलेला दिसून येतो. आइन्स्टाइनने राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांना पत्र लिहून बॉम्ब तयार करण्याचा प्रकल्प हाती घेण्याची विनंती केली. त्याला मान्यताही मिळाली. पण पुढे आइन्स्टाइनच या गोष्टीबद्दल पस्तावेल अशी भविष्यवाणी या दोन व्यक्तिंनी केली होती, ती खरी ठरली. नारळीकरांनी अशाप्रकारे कादंबरीमध्ये प्रायोगिकता आणलेली आपल्याला दिसून येते. कल्पनेलाही वास्तवतेची झालर दिलेली याठिकाणी दिसून येते. यामध्ये मांडलेल्या सर्व घटना या केवळ काल्पनिक आहेत असे नाही. तर मानवाने तंत्रज्ञानामध्ये वेळोवेळी केलेल्या प्रगतीचा थोडक्यात घेतलेल्या आढावा आपल्याला दिसून येतो.

"मानवाला विज्ञानशास्त्राच्या वाढीमुळें जें प्रचंड सामर्थ्य प्राप्त झालें आहे त्या सामर्थ्याचा उपयोग सर्व मनुष्यजातीचा संहार करण्याच्या कामी न करतां सर्व जनतेला हवा असणारा स्वर्ग पृथ्वीवर अवतरविण्याकडे मनुष्यें कसा करूं लागतील हाच मानवसंस्कृतीपुढील आज महत्त्वाचा प्रश्न आहे."[17] अशाप्रकारे विज्ञानाचाा मानवाने केलेला वाढता उपयोग आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम याची माहिती याठिकाणी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पृथ्वीवर अणूबॉम्बचा शोध लागल्यापासून पुढे अंतराळात सोडलेले उपग्रह, लोकांचा यंत्राचा वाढता वापर त्यापासून लोकांना झालेला त्रास, संगणकाचा वापर, प्रतिरूपण प्रयोगाचा शोध या सर्व घटनांचा आढावा त्याचबरोबर प्रगती करत असताना त्यामध्ये वेळोवेळी झालेले बदल आणि सोयींसाठी शोधलेल्या प्रयोगांचे परिवर्तन देशांना आपआपसांत निर्माण होणाऱ्या अणूयुध्दाचा धोका निर्माण झाल्याचे वर्णन आपल्याला या कादंबरीत दिसून येते.

कादंबरीची रचना सुसंगतपणे केली असून सामान्य कादंबरीच्या रचनेत दिसून येणारी सर्व वैशिष्टये याठिकाणी आपल्याला दिसून येतात. लोकांनी प्रगतीच्या नावाखाली स्वतःचे अस्वित्वच कशाप्रकारे धोक्यात आणले आहे. याचे उत्तम उदाहरण आपल्याला याकादंबरीत दिसून येते. यामध्ये आलेल्या सर्व घटना, पात्रे, प्रसंग,स्थळ यांची योग्यता

त्या त्याठिकाणी बरोबर असल्याचे आपल्याला दिसून येते. या कादंबरीच्या माध्यमातून वैज्ञानिक प्रगती पाहत असताना असे लक्षात येते की, मानवानेच आपल्याबुध्दीमत्तेचा वापर करून भौतिक सुखे प्राप्त केलेली आहेत. परंतु तोच मानव या प्रगतीचा मारक ठरू शकतो,हे नारळीकरांनी याठिकाणी दाखवून दिलेले आपल्याला दिसून येते.

## ३.३ 'प्रेषित' व 'अभयारण्य' या कादंबऱ्यांतील वैज्ञानिक जाणिवा आणि विज्ञान

### १. 'प्रेषित' या कादंबरीतील वैज्ञानिक जाणिवा

प्रेषित या कादंबरीमध्ये भविष्यकाळात होणाऱ्या वैज्ञानिक प्रगतीच्या शक्यता वर्तविलेल्या दिसतात. विज्ञानाच्या प्रगतीमुळे त्याचा मानवी जीवनावर, मानवी भावभावनांवर कोणता परिणाम होऊ शकेल आणि पर्यायाने मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय पातळीवरती माणसाचे वर्तन कसे असेल याचे चित्रण दिसून येते. वैज्ञानिक प्रगतीमुळे अनेक गोष्टी शक्य झाल्या आहेत. पण पुढील काही वर्षात परग्रहावर राहणाऱ्या माणसाच्या संस्कृतीशी आपले नाते निर्माण होईल. मित्रत्व, शत्रुत्व निर्माण होईल. त्यामुळे त्यांच्याशी स्पर्धाही वाढेल. अशा परिस्थितीमध्ये भविष्यकाळातील मानवी जीवन कोणत्या प्रकारचे असू शकेल याचे चित्रणही आढळते. विज्ञानकादंबरी या नावातच विज्ञान असल्यामुळे सामान्य वाचक वाचायला बिचकतो. याचे कारण वाचक व विज्ञान यांच्यामध्ये निर्माण झालेला दुरावा. तो नष्ट करण्यासाठी नारळीकरांनी लेखन केले.

विज्ञानसाहित्य हे संपूर्णपणे शास्त्रीय सत्य नसते. तो लेखकाच्या कल्पकतेचा प्रवास असतो. विज्ञान साहित्यातील कल्पित सत्ये वास्तवातही उतरलेली असतात. उदा. आर्थर क्लार्कची सॅटेलाईटस्ची कल्पना, ज्यूल्स व्हर्नच्या कल्पनेतील पाणबुडया, टि. व्ही, विमान, इ. नारळीकरांनी विज्ञानक्षेत्रातील काही प्रयोग कादंबरीच्या माध्यमातून वाचकांना समजावून सांगितलेले आहेत. जीवजनन प्रक्रियेमधले प्रयोग, मानवी मेंदू आधिक प्रगत करण्यासंबंधीचे प्रयोग, मेंदूमध्ये अदलाबदल करण्यासंबंधीचे प्रयोग किंवा निसर्गामधल्या काही गोष्टी प्रभावहीन बनत चाललेल्या आहेत.

विज्ञान कादंबरीचा माणूस हा केंद्रबिंदू झालेला आहे. त्यामुळे माणसाच्या व्यथा, वेदना, श्रध्दा, अंधश्रध्दा, त्याचे भावविश्व या विज्ञानकादंबरीतून साकार झालेले आहे. या

कादंबरीतून समाजाचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढवण्याचा व समाजातील अंधश्रध्दा चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न हेतूपुरस्करपणे नारळीकरांनी केलेला आहे.

विज्ञान कादंबरीमधून विज्ञान सांगत असताना वाचकांचे प्रबोधन व मनोरंजनही करण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणजेच विज्ञानकादंबरी ही केवळ विज्ञान सांगण्यासाठी नसते, तर त्याच्या जोडीला कादंबरीकाराकडे कल्पकता, निरिक्षणशक्ती, समाजाचा अभ्यास, मानसशास्त्र याही बाबींचा सखोल अभ्यास असतो, हे निदर्शनास येते. कादंबरीकार रंजकतेने वाचकांच्या मनावर वैज्ञानिक संस्कार करत असतो. मनुष्यप्राण्याचे इतर प्राण्याहून जे वेगळेपण आहे ते त्याच्या बुध्दिमध्ये. तो त्याच्या बुध्दिच्या जोरावर त्याने इतर प्राण्यावर विजय मिळविला आहे व तल्लख मेंदूच्या व्दारेच त्याने आजपर्यंतची आपली वैज्ञानिक प्रगती केलेली आहे. शेवटी विज्ञान कादंबरीही या मेंदूच्या व्दारेच कागदावर उतरल्या आहेत. सर्वच क्रियावर नियंत्रण ठेवणारा हा मेंदू नावाचा शरिरातील घटक, त्या घटकाच्या करामतींना विज्ञान कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीचा विषय बनवले यात नवल नाही. मानवी शरीरातला मेंदू जरी जन्मजात असला तरी कादंबरीमध्ये कादंबरीकारांनी त्याला यांत्रिकपणाचा मुलामा दिला आहे. नारळीकरांच्या कादंबरीतील पुढील वर्णनावरून आपल्याला याचा प्रत्यय येतो. "त्या दृष्टीनं माझ्या मेंदूत पंचकबद्दल, आमच्या अंतराळयात्रेबद्दल आणि माझ्या उद्दिष्टांबद्दल पुष्कळ माहिती भरण्यात आली. हे काम केलं माझ्या आईवडिलांनी मारु-तारूंनी, विशेषकरून माझ्या वडिलांनी. त्या दोघांना इतरांपेक्षा अर्धा तास जास्त वेळ जगायला मिळालं. आणि तेवढ्या वेळात आपल्या भावना बाजूला ठेवून मला तयार करायची जबाबदारी त्यांची होती. मारूला ती पेलली नाही; तारूनंच ती पार पाडली. त्यानंच मला कॅप्सूलमध्ये बसवून पृथ्वीच्या रोखानं धाडलं..."[८] (प्रेषित, पृ.१२२) प्रेषितमधील या वर्णनावरून विज्ञान किती पुढे जाऊ शकते याचा अंदाज आपल्याला येतो. एखादया बालकाच्या मेंदूत आपल्याला हवी असणारी सर्व माहिती आपण भरु शकतो आणि त्याला पूर्ववत बनवू शकतो, हे दिसून येते. आज काही शास्त्रज्ञ प्रबोधनाच्या भूमिकेतून विज्ञानाची ओळख साहित्याच्या अवगुंढनातून करून देत आहेत. त्यात जयंत नारळीकरांचा समावेश होतो.

त्यांनी विज्ञानाचा मानवीभावभावनावर, मानसिक जडणघडणीवर झालेला जो परिणाम आहे. त्याचा सुक्ष्मपणे वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. आजचे विज्ञानसाहित्य हे नव्या अर्थसौदर्याने भरलेले आहे. त्यातून समाजजीवनाचे दर्शन कथाकारांनी समग्रपणे दर्शविले आहे.

## २. 'अभयारण्य' कादंबरीतील वैज्ञानिक जाणिवा

माणसाने आपली वैज्ञानिक प्रगती करून सर्व प्रकारची भौतिक सुखे प्राप्त केलेली आहेत. यांत्रिक मानवाच्या किंवा संगणकाच्या सहाय्याने माणसाला अशक्य असणारी सर्व कामे तो करवून घेत असतो. हे सध्या वास्तवात देखील आपण मोठ्या प्रमाणात पाहत आहे. शहरातच नाही तर आज खेड्यापाड्यातही संगणक पोहोचलेला आहे.परंतु शास्त्रज्ञांना मनातून त्याची  भीतीदेखील वाटते आहे. कारण माणसाने माणसाचे काम सुसह्य व्हावे म्हणून एकापाठोपाठ एक अशा अनेक गोष्टींचा शोध लावला. या सर्व वस्तू मानवाला साहाय्य करण्यासाठी होत्या. पण कालांतराने मानव त्यांच्या अधिन होऊन गेला. त्याचा परिणाम आपल्याला भोगावा लागेल. या विचारात बरेच शास्त्रज्ञ पडले आहेत. शेवटी माणूसच माणसाच्या नाशास कारणीभूत होणार. ही शक्यता नारळीकरांनी आपल्या लेखनातून व्यक्त केलेली दिसून येते.

'अभयारण्य' या कादंबरीमध्ये आपल्याला ती विज्ञानकादंबरी असल्याचे खऱ्या अर्थाने समजते. कारण, प्रत्येक प्रकरणात विज्ञानाचा काहीतरी चमत्कार आपल्याला दिसून येतो. डॉ. नारळीकर म्हणतात, "विसाव्या शतकात पृथ्वीवर अंतराळ-तंत्रज्ञान अस्तित्वात आले. स्पुटनिकपासून स्पेस-शटलपर्यंतची प्रगती, तीही केवळ चार दशकांत, कौतुकास्पद होती. परंतु, पुरातन मानवाने चाकाचा शोध लावल्यावर जे पहिलेवहिले ओबडधोबड वाहन तयार केले असेल त्याच्या तुलनेत स्पेस-शटल जेवढे अतिप्रगत वाटेल तेवढेच किंवा त्याहून जास्तच हे यान स्पेस- शटलच्या तुलनेत अतिप्रगत होते. करटकाने पृथ्वीभोवती कृत्रिम उपग्रह फिरतात तसे त्या ग्रहाभोवती ते फिरवले आणि दुरूनच ग्रहाबद्दल पुष्कळ माहिती घेतली. उद्देश? यान कुठे उतरवायचे ते ठरवायचे."[१] ( अभयारण्य, पृ.४ ) या विश्लेषणावरून तंत्रज्ञान किती पुढे गेले आहे हे लक्षात येईल.

नारळीकरांनी आपल्या लेखनात विज्ञानाला ठासून भरलेले आहे, असे आपल्याला सतत जाणवत राहते. प्रत्येक ठिकाणी घडणाऱ्या घटनेपाठीमागे आपल्याला विज्ञान दिसून येते. मानवाने आपल्या बुध्दिच्या जोरावर केलेल्या प्रगतीची ही जणू काही पोचपावती दिसून येते. 'अभयारण्य' या कादंबरीत आपल्याला नारळीकरांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वारंवार प्रत्यय येतो. विज्ञान कादंबरी ही विज्ञानातील काही सत्ये सामान्य लोकांसमोर आणण्यासाठी लिहिलेली असते. नारळीकरांनी मात्र वैज्ञानिक सत्ये लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न तर केलेला आहेच, पण त्याबरोबरच मानवाच्या मनात असणाऱ्या भीतीचे वर्णनही यथायोग्य पध्दतीने केलेले आहे. आपण केलेल्या प्रगतीचा अभिमान बाळगत असताना याच तंत्रज्ञानामुळे आपला शेवट होतो की काय? अशी मनामध्ये भीती बाळगत त्यापासून संरक्षणासाठी विविध पर्याय शोधणारा मानव आपल्याला या कादंबरीत दिसून येतो. म्हणजेच नारळीकरांना याठिकाणी इतर लेखकांप्रमाणे विज्ञानाचे दुरूपयोगही दाखवायचे आहेत. ते म्हणतात " हल्ल्यापासून बचाव करायची यंत्रणा विविधमार्गी असते हे सांगायला नकोच. शत्रूचे अड्डेच नष्ट करणं हा एक उपाय. शत्रूचं अस्त्र आपल्या दिशेनं येत असल्यास त्याला आधीच, वाटेतच नष्ट करणं हा दुसरा मार्ग. दुर्दैवानं आपल्यावर हल्ला झालाच तर शेरास सव्वाशेर असा प्रतिहल्ला करणं हा तिसरा उपाय. आणि त्याचबरोबर आम जनतेचं रक्षण करणं हा चौथा! म्हणून हे बंकर......"[१०] (अभयारण्य, पृ.६७) यावरून मानवी जीवनावर होणारे विज्ञानाचे दुष्परिणाम सांगतानाच बचावात्मक धोरणच स्पष्ट केल्याचे आपल्याला दिसून येते.

विज्ञान साहित्यामध्ये विज्ञानाचे महत्त्व सांगितले आहे. त्याचबरोबर त्याचे दुष्परिणामही दाखविले आहेत. एवढं मात्र नक्की विज्ञानाच्या तोटयांपेक्षा फायदे जास्त आहेत. त्याचा योग्य वापर केला तर आपल्याला त्याचा त्रास होणार नाही. त्यासाठी मानवाने तयार राहिले पाहिजे. तंत्रज्ञान आपल्या सोयीसाठी आहे, आपण त्याच्या अधीन होण्यासाठी नाही. हेच आपल्याला विज्ञान साहित्य सांगत असते. अशाप्रकारे, अभयारण्य या कादंबरीतून आपल्याला विज्ञान दिसून येते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## ३.४ 'प्रेषित' कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा

जयंत नारळीकर यांच्या 'प्रेषित' या कादंबरीमध्ये आलोक नाईक या परग्रहवासीचे पृथ्वीवर येण्याचा आयोजन व त्याचा पृथ्वीवर प्रवेश त्याने पृथ्वीवर येऊन आपले काम केले याचे वर्णन आले आहे. भविष्याचा अंदाज या ठिकाणी वर्तवलेला आहे. या कादंबरीमध्ये अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. या कादंबरीचा अभ्यास करत असताना मधील घटनांतील विज्ञान व गांभीर्य समजून घेण्यासाठी 'प्रेषित' मधील व्यक्तिरेखांचा समजावून घेणे आवश्यक आहे.

### १. आलोक कादंबरीचा नायक

'आलोक' हा या कांदबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. त्याच्याभोवती सर्व घटना घडत असतात. आलोकचे अनाथअवस्थेत शेतात सापडण्यापासूनचे प्रसंग येतात. "काय रे, काय प्रकार आहे?" सुधाकरने एका माणसाला विचारले. तो उद्‌गारला, "त्या म्हादयाला एक प्वार सापडलया. आईबापांनी टाकून दिलाय जनू.... शेरातली लई शानी मायबापं असत्यात. अशी प्वारं सोडून दयायची म्हंजे- आपल्या गरिबावर नसती बला पोलिसांची!"[११] ( प्रेषित, पृ.१९ ) अशा प्रकारे कादंबरीमध्ये आलोकचा प्रवेश होतो.

आलोक अनाथ असतो. त्यामुळे त्याला नाईक दांपत्य दत्तक घेते. "मालू! अगदी माझ्या मनातली गोष्ट बोललीस! मूल दत्तक घेण्याबद्‌दल आपण सारखी चालढकल करतोय. आता निसर्गानंच ही देणगी आपल्या ओंजळीत टाकलीय! नाव काय ठेवायचं बेटयाचं?"[१२] (प्रेषित, पृ.२१) लहानपणापासून आलोक अतिशय हुशार आहे. सर्वसामान्य बालकांपेक्षा त्याच्या बुध्दिमत्तेत फरक जाणवत होता. त्याला सतत नवीन बौध्दिक कामाची आवश्यकता वाटत असे. डॉ. साळुंखेंनी आलोकची तपासणी करून सांगितले होते की, सर्वसामान्य मुलांपेक्षा याची बौध्दिक वाढ जास्त आहे. याच्यामध्ये काहीतरी विशेष आहे. त्याच्यामध्ये असणारे हे गुण 'विशेष' हळूहळू नाईक दांपत्याच्या लक्षात येत होते. आलोक लहानपणी आपल्या वयाच्या मुलांमध्ये मिसळत नाही. म्हणून त्याला कमी वयातच शाळेत घातले जाते.

**अफाट बुध्दिमत्ता**

२०३० साली आलोकचा शाळेत प्रवेश झाला. पण तो घरबसल्या कारण त्या काळात मुले घरबसल्याच शाळेत जात असत. दूरदर्शनच्या शालेय चॅनलची वर्गणी भरून आलोकची शाळा सुरू झाली. शाळेच्या पहिल्याच दिवशी आलोकने शाळेतले शिक्षक बैजनाथ मिश्रा यांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. आलोक दहा वर्षाचा असतानाच त्याला मिश्राजीच्या आग्रहावरून वर्ल्ड टॅलेंट स्कीमच्या परीक्षेस बसवण्यात आले आणि पहिल्या दहा मुलात आलोकची निवड झाली. त्याला वर्ल्ड टॅलेंट स्कीमतर्फे चंद्रावर ट्रिपला जाण्याची संधी मिळाली. पण त्याला चंद्रावरच्या ट्रिपमध्ये इतर मुलांप्रमाणे काही विशेष जाणवले नाही. त्याला सतत असे वाटत होते की आपण पूर्वी बऱ्याचदा अशा ठिकाणांची यात्रा केली आहे. त्यामुळे तो या ट्रिपमध्ये पूर्ण शांत होता. त्याचे आश्चर्य त्यांच्याबरोबर असणाऱ्या मार्गदर्शक डोरोथीला वाटत होते. त्यामुळे ट्रिपवरून परत आल्यावर पहिल्यांदा तिने आलोक विषयी सर्व माहिती मिळवली आणि त्याला स्पेस ॲकॅडमीमध्ये प्रवेश मिळवून देते. आलोक हा बुध्दिमत्तेने अतिशय हुशार होता. त्यामुळे त्याच्याबाबतीत घेतले गेलेले सर्व निर्णय बरोबर ठरले.

**अंतराळाविषयी आसक्ती**

आलोकला लहानपणापासून अंतराळाविषयी अतिशय ओढ होती. स्पेस ॲकॅडमीचे ध्येय होते, अंतराळयुगात वावरण्यासाठी मानवाला तयार करणे. स्पेस ॲकॅडमीत आलोकचे दोन सहयोगी बनले. सॅन्ड्रा आणि चेंग. यांनी शेवटपर्यंत आलोकला अतिशय सहाय्य केले. आलोकला एका रात्री अचानक वेडाचा झटका आल्यासारखी परिस्थिती निर्माण होते. आलोक एका ताऱ्याला पाहून एकाग्र होतो आणि आपल्याच तंद्रीत भंग होतो. त्याला पाहून सॅन्ड्राला त्याला वेडाचा झटका आला आहे असे वाटते. सॅन्ड्रा म्हणते, "तो आलोकच आहे हे मी ओळखलं. त्याचे डोळे उघडे होते, पण तंद्रीत असल्यासारखा तो आकाशाकडे पाहत होता. त्याला लागलं नव्हतं किंवा कसला त्रासही होत नसावा. त्याला मी एकदोनदा हाका मारल्या, पण त्यानं काहीच प्रतिसाद दिला नाही. मग मी पाहिलं की त्याचे ओठ हलतायत... काहीतरी शब्द त्याच्या तोंडून निघत होते."[१३] (प्रेषित, पृ.५६) या प्रसंगानंतर सॅन्ड्रा आणि चेंग आलोकवर लक्ष ठेवून असतात. ते दोघे डॉक्टर

साळूंखेना भेटण्याचा निर्णय घेतात. त्यांना त्याच्याबद्दल सर्व परिस्थिती समजावून सांगतात. स्पेस ॲकॅडमीत चौथे वर्ष सुरू झाले तेव्हा आलोक आपला विषय निश्चित करण्यासाठी इतर विदयार्थ्यांप्रमाणे विविध प्रकल्प पाहण्यासाठी जातो. ज्यावेळी तो सायक्लॉप्स पाहायला जातो. त्यावेळी त्याठिकाणी काम करण्याचे तो निश्चित करतो. त्याठिकाणावरून परत आल्यावर आलोकला पुन्हा पहिल्यासारखा झटका येतो. पण यावेळी चेंग डॉ. साळुंख्यांच्या मदतीने त्याच्यावर प्रयोग करत असतो. आलोक त्या अवस्थेत जे काही बोलतो ते सर्व टेप केले जाते आणि त्याची संपूर्ण माहिती डॉ. साळुंख्यांना दिली जाते. त्यानंतर सॅंड्रा आलोकशी बोलते त्यावेळी त्याला काहीतरी वेगळे स्वप्न पडत असल्याचे समजते. या स्वप्नाशी खगोलशास्त्राशी संबंध आहे हे कोणाच्याही लक्षात येत नाही.

पुढे स्पेस ॲकॅडमीच्या दिक्षांत समारोहानंतर संचालक डॉ. मम्फर्ड यांच्या मदतीने आलोकने सॉयक्लॉप्सवर साठ दिवस काम करण्यासाठी परवानगी मिळवली आणि त्याचे काम सुरू झाले. त्यानंतर त्याने फ्रेड या तंत्रज्ञाकडून जॉन प्रिंगलविषयी माहिती मिळवली आणि त्याने सर पीटर यांचीही भेट घेतली. त्याने आपले काम पूर्ण केले.

अथक प्रयत्नानंतर आलोकला आपले काम पूर्ण करण्यात यश आले. ते काम म्हणजे आलोक हा जॉन प्रिंगल यांनी पाठवलेल्या संदेशाला प्रत्युत्तर म्हणून पाठवलेल्या यानातून अंतराळातील अरिस्टार्कस या ग्रहावरून आला होता. पण दुर्दैवाने त्यांच्या यानाला अपघात होतो. त्यामुळे नवजा जन्मलेल्या आलोकवर पृथ्वीवर येण्याची जबाबदारी येते. त्या यानात असणारे त्याचे आई-वडील त्याला यानात असलेल्या ऑक्सिजनच्या मदतीने पृथ्वीवर पाठवतात आणि त्यांचा अंत होतो. आलोकला पृथ्वीवर येवून आपल्या ग्रहावर संदेश पाठवायचा असतो. आपल्या ग्रहवासीयांचे प्राण त्याला वाचवायचे असतात. त्यामुळे आलोक जसजसा मोठा होऊ लागला. तसतसे त्याच्या मेंदूवर केलेल्या संस्कारातून त्याला विविध प्रकारची माहिती डोके वर काढत आहे असे वाटू लागते. त्याला स्वप्न पडू लागले. स्वप्नांमध्ये यानातील शेवटचा प्रसंग त्याला दिसत असे. पण त्याला त्यावेळी पाहणाऱ्या व्यक्तिला वेडाचा झटका आला आहे असेच वाटत

असे. पण आता सर्व गोष्टी स्पष्ट झाल्या होत्या. आलोकला आपण परग्रहावरून कोणत्या कामासाठी आलो आहोत याची पूर्ण जाणीव झाली होती. त्याने आपले काम या साठ दिवसात पूर्ण केले होते. आपल्या ग्रहावर त्याने संदेश पाठवला होता.

कादंबरीतील आलोकची व्यक्तिरेखा ही अतिशय प्रभावी आहे. आलोक हा परग्रहावरून आला असला तरी आई-वडिलांविषयी मनात अत्यंत प्रेम, आदर असणारा आहे. तसेच चांगला संशोधक, अभ्यासक, मित्र, समाजाची बांधीलकी, संस्थेशी प्रामाणिक, कर्तव्यदक्ष,इ. गुणांचा समावेश या व्यक्तीत झाला आहे. म्हणून ही व्यक्तिरेखा प्रभावी आहे. या व्यक्तिरेखेत कादंबरीचा आत्मा सामावलेला आहे.

**सॅंड्रा**

सॅंड्रा ही न्यूझीलंडची होती. ती आलोकला वर्ल्ड टॅलेंट स्कीमतर्फे नेण्यात आलेल्या चंद्राच्या ट्रिपमध्ये भेटली होती. आलोकचा स्वभाव तसा एकलकोंडा आहे. पण सॅंड्रामुळे आलोक आनंदितही होत असे. सॅंड्रानेच आलोकमध्ये काहीतरी वेगळे आहे, याची जाणीव चेंगला करून दिली होती. ती अतिशय हुशार आहे. मानसशास्त्रांचा ती अभ्यास करीत आहे. आलोकच्या ज्ञानाविषयी तिच्या मनात अतिशय आदर होता. आलोकही तिच्याशी मनमोकळेपणाने बोलत असे. तिने चेंगला आलोकवर केलेल्या प्रयोगात खूप मदतही केली होती. तिच्यामुळे आलोकच्या अंतर्मनात काय घडले हे चेंग व डॉ. साळुंखेंना समझले होते. आलोकच्या स्वप्नाविषयी जाणून घेताना तिने अतिशय तर्कसंगतपणे आलोकच्या मनातून हुशारीने सर्व माहिती काढून घेतली होती. ती आलोकला म्हणते, "अरे बेटया! कळेल कसं? फक्त आमच्या शास्त्राच्या वैज्ञानिक सिध्दांताच्या आधारानं मी तो तर्क मांडला. तुम्ही जसे भौतिकशास्त्राच्या सिध्दांताच्या आधारानं भाकितं करता तसंच मीही केलं. एवढं मात्र मी कबूल करते, तुला स्वप्न कसलं पडलं ते सांगण्याइतकं आमचं शास्त्र पुढं गेलेलं नाही. ते स्वप्न तू मला सांगावंस असा माझा आग्रहही नाही. पण सांगितलंस तर कदाचित मी त्यावर भाष्य करू शकेन."[१४] (प्रेषित,पृ.७६.) यावरून आपले काम चाणाक्षपणे पूर्ण करून घेण्याची तिची क्षमता दिसून येते.

ज्यावेळी आलोक हा परग्रहवासी होता, हे सर्वार्थाने सिध्द होते. त्यावेळी तो आपले काम म्हणजे आपल्या ग्रहावर संदेश पाठवून पृथ्वीविषयी माहिती देण्याचे काम पूर्ण करण्यासाठी तयार होतो. सॅन्ड्रा त्यावेळी आलोकला रोखते. सर पीटरनी आलोकला पाठिंबा दिल्यानंतर ती त्यांना समजावते. "सर पीटर! ह्याच्या भुलावण्याला फसू नका. शास्त्रज्ञ म्हणून तुम्हांला जिज्ञासा आहे तिचा तो गैरफायदा घेऊ पाहतोय. मी पण फसले असते, पण तो एक वाक्य बोलून गेला त्यात सर्व काही आलं... किडे, झुरळं यांचचं याच्या लोकांनी निर्मूलन केलं, कारण त्यांना ह्या निकृष्ट जीवांची गरज भासत नव्हती. केवळ नसता उपद्व्याप कशाला म्हणून त्यांनी हे जीव काढून टाकले.... यांच्या दृष्टीनं मानवदेखील निकृष्ट, मागासलेले. मानव स्वत: कितीही प्रगत समजो, त्याचं हे मोठेपण पृथ्वीपर्यंतच मर्यादित आहे."[१५] (प्रेषित,पृ.१२५.) यावरून तिच्या मनात मानव जातीविषयी असणारी कळकळ दिसून येते.

वरील अनेक प्रसंगांतून प्रस्तुत कादंबरीतील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणून सॅन्ड्रा या व्यक्तिरेखेकडे आपणांस पाहता येते. 'प्रेषित' या कादंबरीत आलोकचे जीवनचरित्र उलघडत असले तरी सॅन्ड्राच्या स्वभावाचे अनेक पैलू प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे याठिकाणी उलघडून दाखविले आहेत. तिच्यातील कष्टाळूपणा, संशोधनाची असणारी आवड, धाडस, पृथ्वीविषयी असणारे प्रेम यासारखे महत्त्वपूर्ण स्वभावविशेष दिसून येतात.

**चेंग**

चेंग हा सिंगापूरचा चिनी रहिवासी हुआन चेंग. चेंग हा आलोक आणि सॅन्ड्रा यांच्या एक वर्ष पुढे होता आणि त्या दोघांप्रमाणेच त्यांच्या अगोदरच्या वर्षी चंद्राची वारी करून आला होता. ज्या परिस्थितीत चेंगची आलोकशी दोस्ती झाली ती 'अद्भुत' आहे.

चेंग हा स्पेस ॲकॅडमीच्या रॅगिंग कमिटीचा चेअरमन होता. सर्वात जास्त खोडया व हुडपणा करणारा. पण तेवढाच हुशार आणि बुध्दिमान. आलोकचा नवीन प्रवेश झाल्यावर त्याच्यावर रॅगिंग करण्याच्या निमित्ताने त्याची आणि आलोकची पहिली भेट होते. त्यावेळेपासून दोघे मित्र बनतात. चेंग हा आलोकबरोबर शेवटपर्यंत दाखवला आहे.

आलोकचा सॅड्राशिवाय असणारा हा एक जीवाभावाचा मित्र. तो एकटाच काय तो आलोकचा मित्र होता.

आलोकमधला बदल सॅड्राने त्याला सांगितल्यावर तो लगेच डॉ. साळुंखेंना भेटतो. त्यांच्याशी चर्चा करतो. त्यांच्या मार्गदर्शनानुसार आलोकवर प्रयोगही करतो. ज्यावेळी त्याला आलोकच्या विचित्र वागण्याविषयी समजते. त्यावेळी तो डॉ. साळुंखेंना भेटतो. तो त्यांना सर्व माहिती व्यवस्थित सांगतो. चेंगने आलोकला आलेल्या झटक्यांची संपूर्ण माहिती दिली आणि म्हटले, "तुम्ही स्वतः मेंदूवर पुष्कळ प्रयोग केलेयत. खुद्द आलोकला तुम्ही लहानपणापासून पाहत आलात. तेव्हा तुमचा सल्ला घेणे आवश्यक आहे असं सॅड्रानं आणि मी ठरवलं." [१६] (प्रेषित, पृ.६०.) यावरून आलोकविषयी चेंगच्या मनात असणारी काळजी आपल्याला दिसून येते.

चेंगला अंतराळप्रवासासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाचा सखोल अभ्यास करण्याची विशेष आवड होती. त्याने स्पेस ॲकॅडमीत अंतराळप्रवासासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाचा सखोल अभ्यास करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचा हा निर्णय म्हणजे त्याच्या लाहनपणापासूनच्या महत्त्वाकांक्षेची फलनिष्पत्ती होती. बारा वर्षांचा असताना त्याने आपल्या हिमतीवर एक रॉकेट बनवले होते. दोनशे फूट उंचीपर्यंत ते उड्डाण करू शकत होता आणि चेंग जमिनीवरून रिमोट कंट्रोलने ते रॉकेट थोडेफार इकडेतिकडे फिरवू शकत असे. एकदा त्याचा हिशोब चुकल्याने ते रॉकेट शाळेच्या मुख्याध्यापकांच्या खिडकीची काच फोडून त्यांच्या टकलावर आदळले. तेव्हा त्याच्या प्रयोगांवर कायमची बंदी घालण्यात आली. परंतु एक दिवस खरेखुरे अंतराळ-रॉकेट बनवायचा त्याने निर्धार केला होता. स्पेस ॲकॅडमीच्या वर्कशॉपमध्ये आता तो त्या प्रकल्पावर काम करत होता. त्याच्याकडे आपल्या कामाविषयी आस्था होती. त्याचबरोबर आपले काम करत असताना मनामध्ये असणारी जिज्ञासाही त्याच्याकडे होती. डॉ. साळुंखें यांच्याशी बोलत असताना आलोकविषयी वाटणारी काळजी आणि डॉक्टरांच्या विधानातील सत्यता पडताळून पाहण्याची त्याची जिज्ञासा आपल्याला त्याच्या पुढील वाक्यातून दिसून येते. "तुम्ही त्याचं वय निश्चित केलं तेव्हा वैदयकशास्त्र आजच्याइतकं पुढं गेलेलं नव्हतं. आज आपण माणसाचं वय काही तासांपर्यंत बरोबर सांगू शकतो. आपण असं धरून चालू की आलोक

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सापडला तेव्हा त्याचं वय १०० ते ११० दिवस यांच्या दरम्यान होतं.... तर माझे तुम्हांला दोन प्रश्न आहेत. प्रश्न नंबर एक: ज्या भाषेत आलोक स्वप्नात बडबडतो ती त्याची मातृभाषा असेल तर ती भाषा तो अवघ्या १०० ते ११० दिवसांत आणि तीसुध्दा शैशवास्थेत, अगदी तान्हं बाळ असताना शिकला तरी कसा? प्रश्न नंबर दोन: जर ही भाषा तो कसातरी शिकला तर ती भाषा तो लगेच विसरला कसा? जेव्हा तो सापडला तेव्हा काही ही भाषा बोलत नव्हता. तेव्हा त्याचे व्यवहार तान्हा मुलासारखेच होते."[१७] (प्रेषित, पृ.८२.)

वरील अनेक प्रसंगातून आपल्याला चेंगच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू दिसतात. आलोकविषयी अत्यंत आदर, प्रेम व काळजी, त्याचबरोबर एक आदर्श अभ्यासक, जिज्ञासू, चांगला मित्र असे अनेक गुण आपल्याला दिसून येतात. चेंग हे व्यक्तिमत्व या कादंबरीमध्ये आपला विशेष प्रभाव दाखवते.

**जॉन, पीटर, मॅकार्थी**

जॉन प्रिंगल हा एक शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ होता. सॉयक्लासवर नोकरी करत होता. रेडिओ-लहरींच्या खगोलशास्त्रात त्याने एके काळी महत्त्वाचे संशोधन केले आहे.

सॉयक्लॉप्सवर नोकरी करत असताना प्रथम सॉयक्लॉप्ससारख्या वेधयंत्राचा दुरूपयोग चाललेला पाहून त्याला खंत वाटते. पण हळूहळू त्याने आपली कल्पकता वापरून सॉयक्लॉप्सचा सदुपयोग करायला सुरूवात केली. आपल्याला दिलेले टेहळणीचे काम उरकले आणि वेळ उरला तर तो त्या वेळात चोरून सॉयक्लॉप्सचा उपयोग वैज्ञानिक वेधांकरीता करीत असे. हळूहळू सुरक्षानियमांतून वाट काढत त्याने पुष्कळ संशोधन केले. आपल्या सर्व संशोधनाच्या बद्दल जॉन आपला मित्र पीटर याच्याशी मोकळेपणाने चर्चा करत असे.

जॉन आणि पीटर यांच्या संयुक्त विचारांनी त्या दोघांचा सॉयक्लॉप्सवर एक प्रकल्प चालला होता. या प्रकल्पाच्या आधारे पृथ्वीशिवाय अन्य ग्रहावर कोठेतरी जीवसृष्टी आहे का? हे शोधणे आणि जीवसृष्टी शोधल्यानंतर त्या सृष्टीवर पृथ्वीवरून संदेश पाठवायचा, त्यांच्या उत्तराची वाट पाहायची. पण ज्यावेळी जॉनला जीवसृष्टी सापडते तेव्हा तो एकटाच त्याठिकाणी संदेश पाठवतो. त्या संदेशाचे प्रत्युत्तर म्हणूनच

आलोक हा पृथ्वीवर आलेला असतो. पुढे आपण पाठवलेल्या संदेशाची माहिती सांगण्यासाठी जॉन पीटरला भेटायला जात असतो. तेव्हा रस्त्यातच त्याचा अपघात होतो. त्या अपघातात तो मरण पावतो.

जॉन हा अतिशय हुशार संशोधक होता. त्याने सॉयक्लॉप्सचा उपयोग चोरून केला असला तरी त्याने अतिशय महत्त्वाचे काम केले होते. त्याचा परिणाम पुढे झाला होता. मात्र आपल्या प्रयोगाची झालेली फलनिष्पत्ती पाहायला तो जीवंत नव्हता. पीटरनी मात्र ते पाहिले होते. ज्यावेळी जॉनने संदेश पाठवला, त्यावेळी तो उत्साही होता. पण त्याच्या मनात पृथ्वीविषयी काळजीही दिसून येते. "आपण संदेश पाठवला ते योग्य केले का? की त्यामुळे केव्हातरी मानवालासुध्दा परकीय अमंलाखाली पृथ्वीच्या कोपऱ्यात कुठेतरी कुढत राहावे लागेल?"[१८] (प्रेषित, पृ.१६.)

पीटर हा जॉनचा मित्र. एवढीच ओळख सुरूवातीला पीटरबद्दल आलेली आहे. पण कादंबरीच्या शेवटी सॅंड्राला मदत करून आलोकची खरी ओळख पटविण्याचे महत्त्वाचे काम पीटरने केलेले आहे. त्याचबरोबर आलोकला आपल्या ग्रहावर संदेश पाठवण्यासाठी संमती देणारा पहिला आणि एकमेव मानव म्हणजे सर पीटर होता. नारळीकरांनी या पात्राच्या तोंडी शेवटी दिलेले उद्‌गार नारळीकरांचा मानवजातीविषयीचा असणारा अभ्यास आणि भविष्यकालीन मानवावर असणारा विश्वास या दोन्ही गोष्टी दाखवून देतो. विज्ञान आणि मानव यांच्यामध्ये असणारे अतूट नाते सांभाळणे माणसाच्या हातात आहे. हे नारळीकरांनी याठिकाणी सांगितले आहे. शेवटी सर पीटर सॅंड्राला समजवतात, "सॅंड्रा! सबंध मानवजातीचं भवितव्य माझ्या एकट्याच्या हाती येईल असं मला कधी वाटलं नव्हतं. पण मी लहानपणापासून जुगार खेळत आलोय....... आणि हा माझा आयुष्यातला सर्वात मोठा जुगाराचा डाव आहे. तू म्हणशील, मी आलोकच्या भुलावण्याला भुललो, त्याच्या विनवण्याला द्रवलो, आणि फसलो. मला तसं वाटत नाही. रेड इंडियन काय किंवा भारतीय राज काय, त्यांनी विज्ञानाची, तंत्रज्ञानाची किंमत ओळखली नाही आणि आपापल्या तंट्यांमध्ये स्वातंत्र्य गमावलं. आजची मानवसंस्कृती विज्ञानाचं महत्त्व ओळखते. तिच्याकडून अशी चूक होणार नाही. त्या बाबतीत मी आशावादी आहे. आलोकच्या ग्रहबांधवांनी दिलेल्या दारूनं गुंग होण्यापेक्षा त्यांच्याकडचं

बाळकडू मागून पिणं जास्त महत्त्वाचं आहे. आणि तसा नीरक्षीरविवेक आपल्या समाजात आहे असं मला वाटतं. म्हणून मी आलोकला आडकाठी केली नाही."[११] (प्रेषित, पृ.१२५,१२६.) वरील उद्गारातून नारळीकरांनी मानवजातीच्या कल्याणाचा विचार केलेला दिसतो. यातून त्यांना मानवाला आपली भविष्यातील विज्ञान व तंत्रज्ञानाची असणारी गरज ओळखण्याचा संदेश दयावयाचा आहे.

मॅकार्थी हा सॉयक्लॉप्सचा सुरक्षाधिकारी होता. त्याला जॉन आणि पीटर यांच्याविषयी शंका होती. हे दोन वैज्ञानिक सॉयक्लॉप्सचा काहीतरी गुप्त कारस्थान करीत आहेत. असे त्याला सारखे वाटत होते. जॉन सॉयक्लॉप्सवर संदेश टेप करून बाहेर घेऊन जातोय. हे त्याला आपल्या एका यंत्राने समजते. त्यावेळी तो जॉनचा पाठलाग करतो. जॉनचा अपघातात मृत्यू होतो. परंतु, मॅकार्थीचा संशय खरा ठरतो. जॉन खरचं अनधिकृतपणे सॉयक्लॉप्सचा वापर करत असतो.

जॉन, पीटर,मॅकार्थी या व्यक्तिरेखा आपापल्या ठिकाणी बरोबर आहेत. त्यांच्यामुळे कादंबरीचे मूळ कथानक सुरू झाले आहे. त्यामुळे याठिकाणी त्यांना विशेष महत्त्व आलेले आहे.

**मालिनी नाईक, सुधाकर नाईक, डॉ. साळुंखे**

प्रेषित या कादंबरीतील आलोकचे आईवडील या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत. मालिनी आणि सुधाकर नाईक हे आलोकचे आईवडील ज्यानी आलोकला दत्तक घेतलेल्या असतो. मालिनी ही सर्वसामान्य गृहिणी आहे. चारचौघीसारखेच आपल्या मुलाकडून अपेक्षा ठेवणारी. त्याच्या बुध्दिची असामान्य झेप ती पाहू शकत नाही. म्हणून ती काहीवेळेला नाराज होते.

सुधाकर मात्र आपल्या मुलाच्या बुध्दिमत्तेबद्दल विशेष अभिमान बाळगून आहे. आलोकच्या बौध्दिक भुकेची त्याला जाणीव आहे. त्याला आलोकमध्ये विशेष असे काहीतरी आहे याची जाणीव आहे. मालिनीच्या नाराजीवर तो तिला समजावतो, "जरा त्याच्या बाजूनं विचार कर की! संत्र्याची साल काढून आतला भाग खातात हे त्यानं पाहिलयं आणि त्याला माहीत झालंय. तसंच आपली बोटं साल काढू शकणार नाहीत याची त्याला जाणीव आहे. तेव्हा उगीच संत्र्याशी झगडण्यात काय फायदा?

म्हणून तो गप्प बसला. उलट तो महेंद्रच बिनडोक. त्याला अजून कळलं नाही की संत्र्याची साल काढल्यावर आतला भाग खायचा असतो."[२०] (प्रेषित,पृ.२५.)

आलोकला घडविण्यात डॉ. साळुंख्याचाही मोठा वाटा आहे. त्यांनी सुरूवातीला आलोकवर विशेष प्रयोग करून त्याच्या असामान्यत्वाबद्दल सुधाकरला माहिती दिली होती. त्याचबरोबर वेळोवेळी त्याच्या हालचालींवर नजर ठेवून ते होते. त्याच्या वाढीकडे पूर्णपणे लक्ष ठेवून होते. त्यांना ज्यावेळी आलोकच्या विचित्र स्थितीविषयी सॅंड्रा आणि चेंग माहिती देतात. त्यावेळी त्यांच्या बोलण्यातून त्यांना एक वेगळाच उत्साह येतो. आपण करत असलेला विचार बरोबर आहे. याची त्यांना खात्री पटते. ते सॅंड्रा आणि चेंगला आलोक हा परग्रहावरून आलेला आहे, असे सांगतात. आलोकही डॉ. साळुंख्याचा आदर करतो.

अशाप्रकारे, अनेक लहानमोठया व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत. बैजनाथ मिश्रा, डोरोथी फील्ड, मेजर साइक्स, मेजर साइक्स, फ्रेड मॉरिस, जॉक युइंग यांच्यासारख्या अनेक व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत. त्यांनी वेळोवेळी आलोकला साहाय्य केलेले आहे. त्याच्या बुध्दिमत्तेचा आदर केलेला आहे. आपआपल्या परीने आलोकचे काम पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व व्यक्तिरेखांमुळे कादंबरीत जीव आलेला आहे.

अशारीतीने या कादंबरीतील अनेक व्यक्तिरेखांच्या माध्यमातून डॉ. नारळीकरांनी वैज्ञानिक जाणिवा आणि सामाजिक वास्तव यांचा अनुबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत कादंबरीतील सर्वच आशय व व्यक्तिरेखा 'आलोक' या व्यक्तिरेखेभोवती फिरताना दिसतात.

### ३.४ 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणे

जयंत नारळीकर यांच्या 'अभयारण्य' या कादंबरीमध्ये दमनक आणि करटक या दोन व्यक्तिरेखा प्रमुख आहेत. पृथ्वीवर निरिक्षण करण्याच्या हेतूने आलेल्या असतात. ते दोघे पृथ्वीवर होणाऱ्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवून होते. भविष्याचा अंदाज प्रस्तुत कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या माध्यमातून वर्तवलेला आहे. या कादंबरीमध्ये अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. या कादंबरीचा अभ्यास करत असताना त्यामधील घटनांतील

विज्ञान व गांभीर्य समजून घेण्यासाठी 'अभयारण्य' मधील व्यक्तिरेखा हा महत्त्वाचा घटक ठरतो. त्यामुळे अभयारण्यामधील सर्व व्यक्तिरेखांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरेल.

**दमनक आणि करटक**

करटक आणि दमनक हे दोघे साधारण सहा फूट उंचीचे आहेत. करटकाचा स्वभाव सौम्य आणि समजुतदारपणा दर्शवणारा तर दमनकाची करारी आणि किंचित हट्टीपणा दाखवणारा आहे. पण दोघेही लहानपणापासूनच मित्र आणि आता अंतराळसाहसातले सहयोगी आहेत. अशाप्रकारे, दोघांचा कादंबरीत प्रवेश होतो. या दोघांनी पृथ्वीचे बारकाईने निरिक्षण करायला सुरूवात केलेली असते.

अभयारण्यच्या सुरूवातीच्या प्रकरणात आगीचा शोध लावण्यासाठी छोटा टंबू जंगलात जातो. त्यावेळी जे दगड योगायोगाने त्याच्यासमोर एकमेकांवर आदळलेले असतात. ते दगड जणूकाही या दोघांनी जाणूनबुजून एकमेकांवर टाकलेले असतात. आगीचा शोध लावण्यात या दोघांचा मोठा वाटा असतो. पुढे वैवस्वत मनूला रात्रीच्या अशाच एका निरिक्षणात त्याला सप्तर्षींच्या-सात ताऱ्यांच्या- समूहात एक पुसटसा पुंजका दिसतो. हा पूर्वी होता का नव्याने आकाशात आला हा त्याला प्रश्न पडतो. पूर्वी होता की नाही हे सांगणे कठीण होते, परंतु पुढे तो कुठे राहतो हे पाहणे त्याला निश्चितच जमण्यासारखे होते आणि तशी निरिक्षणे घ्यायचा त्याने निश्चय केला आहे. त्याने स्वस्थ चित्ताने धूमकेतूचे निरिक्षण केले. हळूहळू तो सूर्याच्या दिशेने जात आहे हे त्याने ओळखले. तो पृथ्वीच्याही जवळ येईल...... नेमका किती जवळ? मनूला त्यांची प्रथमच जाणीव झाली की ही माहिती मिळवण्याचे ज्ञान आपल्याजवळ नाही. नवीन असे हे ज्ञान कुठे मिळेल? निदान आपल्या प्रश्नाचे उत्तर कोणी देऊ शकेल काय? अशा चिंतेत मनू असतानाच आकाशवाणी होते आणि त्याला पुढे येणाऱ्या संकटाची माहिती मिळते. त्या संकटातून मानवजातीबरोबर व इतर सजीवसृष्टीला वाचवण्यासाठी त्याला मार्ग दाखविला जातो. त्याला मार्ग दाखविणारे हे दोघे असतात.

अ‍ॅथेन्समध्ये एक रोग जोरात पसरू लागला. अ‍ॅथेन्समध्ये वास्तविक हा रोग कुठून आला हे अजूनही कोडे आहे. विसाव्या शतकात दोन शास्त्रज्ञांनी - फ्रेड हॉएल आणि चंद्रा विक्रमसिंहा यांनी - एक तर्क मांडला की नवे रोगजंतू अंतराळातून येत

असतात. त्यापैकी काही आपल्या वायुमंडलाचे कवच भेदून पृथ्वीतलावर येतात. या नव्या रोगांचा प्रतिकार करणारे प्रतिजंतू पृथ्वीवर नसल्याने असे रोग झपाट्याने पसरतात. तसेच संपूर्ण वायुमंडलातून त्यांचा वर्षाव होत असल्याने जमिनीवर दूरदूरची ठिकाणे एकाच वेळी त्याला बळी पडतात. केवळ संसर्गाने रोगाचा प्रसार फार तर एका वस्तीत किंवा एका गावात होईल. पण १९१८ सालचा इन्फ्लुएंझा जवळजवळ एकाच दिवशी मुंबई आणि बॉस्टन अशा एकमेकांपासून खूप दूर असलेल्या शहरांत कसा पसरला हा प्रश्न या दोघा शास्त्रज्ञांनी उपस्थित केला. त्यावेळेला वैदय बर्टोलाच्या स्वप्नांत येवून यावर काय उपाय करता येईल याची माहिती दिली. ती माहिती देणारे हे दोघेच होते.

जेम्स वॅटला लागलेल्या बाष्पउर्जेच्या शोधाचे हे दोघे साक्षीदार असतात. त्या काळात शुध्द हवेच्या बाजूने बोलणाऱ्या चार्ल्स लिंड्से. त्याला समर्थन देताना हे दोघे सांगतात की, "पुढंमागं अशी स्वयंचलित वाहनं- ऑटोमोबाइल म्हणा हवं तर- येतील. पण त्यांच्यामुळं निर्माण होणारं प्रदूषण पाहून तुम्हांला वाटेल, ह्यापेक्षा घोडयाची लीद बरी होती!"[२१] (अभयारण्य, पृ.२३.) असे म्हणून हे दोघे त्याठिकाणाहून निघून जातात.

बॉम्बचा लागलेला शोधाचे साक्षीदारही हेच होते. त्यानंतर लोकांचा तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम हनामीच्या माध्यमातून दाखविला आहे. "आपण निसर्गापासून लांब चाललो आहोत त्याची ही ताकीद समजा!" तो म्हणाला, "सीडर जातीची झाडं आपण सर्वत्र एकजात लावली. त्यांचा त्रास पुष्कळांना होतो. इतरही काही झाडांची ॲलर्जी विशेषकरून वसंतऋतूत होते. आपण तो उपसर्ग टाळण्याकरता हे फिल्टर वापरतो. पण त्रस्त होणाऱ्यांची संख्या वाढते आहे. ह्याचं मूळ कारण शोधलं तर कदाचित हा त्रास कायमचा दूर करता येईल......"[२२] (अभयारण्य, पृ.३६.) अशाप्रकारे, प्रत्येक ठिकाणी लोकांना वाचवणारे उपाय सुचवणारे हे दोन देवदूत प्रत्येक ठिकाणी हजर असतात. क्लोनिंगची कल्पना माणसाच्या मनात आल्यानंतर त्याचे दुष्परिणाम समजवणारेही हे दोघेच असतात. ते लोकांना समझावण्याचा प्रयत्न करतात की, जीवनात आणि ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे नेताना निसर्ग स्वाभाविकपणे जे बदल घडवून आणतो ते परिस्थितीशी अनुरूप असतात. त्यात मानवाने ढवळाढवळ करू नये. शिवाय, आपण इतर शोधांबद्दल पाहिलं तसं या बाबतीतही घडू शकते... मानव या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विलक्षण हत्याराचा गैर उपयोग करू शकतो. १९३०-४०च्या दरम्यान जर नाझीयाकडे हा शोध असता तर आपल्या वंशवादाच्या विकृत कल्पनांना त्यांनी किती भयानक रूप दिलं असते? थोडक्यात हे ज्ञान सुज्ञपणे वापरण्याची ऐपत जोपर्यंत तुमच्या समाजाकडे येत नाही, तोपर्यंत ते गुलदस्ताचं राहिलेले बरे. निसर्गच ही जबाबदारी पार पाडू शकेल.

चरम ४च्या लोकांना पृथ्वीच्या सुबत्तेविषयी माहिती मिळते. त्यांनी सर्वानुमते पृथ्वीवर वसाहत स्थापण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी त्यांनी पृथ्वीवर घुसण्याचा प्रयत्न परतवणारेही हे दोघेच होते. प्रगतीच्या उच्च शिखरावर पृथ्वी पोहोचत असतानाच पृथ्वीवरील देशांमध्ये एकमेकांविषयी तिरस्कार निर्माण होतो. भारत व पाकिस्तान सारखी राष्ट्रे एकमेकांवर आक्रमण करण्याच्या तयारीत असताना त्यांचे अण्वस्त्र साठे निकामी करणारे हे दोघेच होते. या सर्वावरून असे दिसून येते की या दोघांना पृथ्वीची अतिशय काळजी वाटत होती. पृथ्वीच्या चांगल्या भवितव्यासाठी ते झटून काम करत होते. यामध्ये विज्ञानाची माहिती तर त्या दोघांना आहेच पण त्याचबरोबर त्याचे होणारे दुष्परिणामही त्यांना माहित आहेत.

दमनक व करटकच्या व्यक्तिरेखा या कादंबरीतील प्रभावी व्यक्तिरेखा आहेत. दमनक व करटक हे परग्रहावरून आले असले तरी पृथ्वीवरील लोकांविषयी त्यांच्या मनात अत्यंत प्रेम, आदर आहे. तसेच चांगले संशोधक, अभ्यासक, मित्र, समाजाची बांधीलकी, कर्तव्यदक्ष,इ. गुणांचा समावेश या व्यक्तींत झाला आहे. म्हणून या व्यक्तिरेखा प्रभावी ठरतात. या व्यक्तिरेखांत कादंबरीचा आत्मा सामावलेला आहे.

या दोन व्यक्तिरेखा व्यतिरिक्त अशा अनेक व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत. टंबू ही व्यक्तिरेखा अतिशय बोलकी आहे. सर्वसामान्य कादंबरीत ज्याप्रमाणे पात्रे साधी असतात त्याचप्रमाणे हा टंबूसुध्दा साधा आहे. आपल्या कुटुंबियांना थंडीपासून वाचवण्यासाठी टंबू आगीच्या शोधात जातो. आग सापडल्यावर धावतच आपल्या गुहेकडे येतो. त्यावेळी जणू आपण जगच जिंकले आहे असे त्याला वाटते. तो म्हणतो, “ही पहा तुमची आग! मी घेऊन आलो, आजोबा.....”[२३] (अभयारण्य, पृ.१.) यातून त्याचा आनंद आपल्याला पाहायला मिळतो. यातूनच त्याला आपल्या कुटुंबियांची असलेली काळजी दिसून येते.

वैवस्वत मनू अशीच एक वेगळी व्यक्तिरेखा आहे. एक हुशार तरूण. त्याचे व्यवहारज्ञान वाखाणण्याजोगे आहे. म्हणून अनेक बाबतींत त्याचा सल्ला मागितला जाई. आकाशातल्या बदलत्या तारकाचक्रावरून तो हवामानाचे भाकीत करू शकतो. म्हणून शेतकरी त्याला मान देत. परंतु समाजोपयोगी ज्ञानदान करत असूनही मनू एकंदर समाजापासून अलिप्त राहतो. त्याला एकान्त आवडतो आणि त्यासाठी तो रोज काही काळ वस्तीजवळच्या जंगलात चिंतन करत बसे. अर्थात रात्रीही आकाश निरभ्र असेल तर तारकांचे निरिक्षण करण्यात त्याला अनेक घटिका घालवयला आवडे. तोच लोकांना धूमकेतूच्या आलेल्या संकटापासून वाचवितो. लोकांच्या कल्याणाची भावना आपल्याला या व्यक्तिरेखेतून दिसून येते.

वैदय बर्टोला लोकांना अज्ञात रोगापासून वाचविणारे. त्यांनाच स्वप्नात दृष्टांत होतो. ते सर्वांना मिळालेल्या माहितीच्या आधारे एकमेकांना वाचवतात. जेम्स वॉट, त्याची आई या व्यक्तिरेखा फार थोडया काळासाठी कादंबरीत येतात. पण त्या आपला ठसा वाचकांच्या मनावर उमटवून जातात. जेम्सने लावलेला शोध आजही सर्व जगाच्या नजरेसमोर असलेला आपल्याला दिसून येतो. त्याची आई सर्वसामान्य आईप्रमाणे आपल्या मुलाने इतर मुलांप्रमाणे आपल्याला घरकामात मदत करावी ही अपेक्षा करणारी आहे. चार्ल्स लिंड्से औदयोगिक क्रांतिने अस्वस्थ होणारा आहे. लोकांना औदयोगिक क्रांतिचे होणारे दुष्परिणाम सतत पटवून देत फिरणारा असा आहे. त्याच्या व्यक्तिरेखेतून नारळीकरांनी सर्वसामान्य माणसांकडून वाढत्या सुखसोयीपोटी त्याच्या दुष्परिणामांकडे होणारे दुर्लक्ष दाखविले आहे.

दोन गिर्यारोहकही या कादंबरीत आपल्याला भेटतात. त्यांची बुध्दिमत्ता अतिशय तीक्ष्ण आहे. जगातील विविध देशांमध्ये वाढता तिरस्कार आणि एकमेकांबद्दल असणारी मनातील अढी याचा परिणाम मानव जात संपवण्यात तर होणार नाही ना? अशी काळजी करण्याऱ्या या दोन व्यक्तिरेखा आहेत. पहिला गिर्यारोहक म्हणाला, "पहा! मी सांगत नव्हतो? शीतयुध्द संपलं तरी हे आक्रमक शोध थांबत नाहीत. मानव काही तरी वेगळं कारण शोधून ते चालूच ठेवतो." [२४]( अभयारण्य, पृ.३१. ) यावरून या दोघांच्या

मनात असणारी तळमळ दिसून येत आहे. त्यांच्याकडे अतिशय प्रगत असे तंत्रज्ञान आहे. त्याचा वापर करून ते पृथ्वीचे निरिक्षण करत आहेत.

टोमोको व केंजी या दांपत्यांचा मासाफूमी हा मुलगा आहे. हे सर्वजण साकूरा पाहण्यासाठी जातात. मासाको आणि हिदेकी हेही आपल्या चिए मुलीबरोबर आलेले असतात. ही सर्व मंडळी त्याठिकाणी साकूराचा आनंद लूटत असताना त्यातील केंजीला साकूराच्या या झाडांच्या ॲलर्जीचा त्रास होतो. त्याला त्या त्रासापासून वाचविणारे हे दोघेजणच होते. पुढे एका मार्केटमधील एका दुकानात असणाऱ्या पर्यवेक्षकाला नगद पैशामध्ये व्यवहार करणाऱ्या आपल्या ग्राहकांबद्दल आश्चर्य वाटते.

त्यानंतर कादंबरीत आलेली पात्रे म्हणजे परग्रह चरम ४ वर राहणारे रहिवासी. त्यांची विस्ताराने माहिती कादंबरीत येत नाही. पण त्याठिकाणी वीस व्यक्तिमध्ये भरलेल्या सभेत पृथ्वीविषयी केलेले भाकित मात्र चिंताजनक आहे. ते भाकित करताना हे रहिवासी म्हणतात, “पृथ्वीवासी स्वत:ला मानव म्हणतात. पृथ्वीवर इतर जीव आणि वनस्पती पुष्कळ आहेत. चरम-४च्या तुलनेत ही विपुलता जाणवते. पण मानव त्यातला सर्वात प्रगत असला तरी आपल्या तुलनेत मागासलेला आहे. त्याने पाठवलेल्या संदेशात तो किती ऊर्जा वापरतो ते दिले आहे. सूर्याकडून पृथ्वीकडे येणाऱ्या ऊर्जेचा नीट वापर करु शकला नाही म्हणून त्याला ऊर्जेची कमतरता भासते. पण ह्यावरून तो किती मागासलेला आहे ते ध्यानात घ्यावं.”[२७] (अभयारण्य, पृ.७३.) यावरून त्या लोकांचे पृथ्वीवरील लोकांविषयी असणारे त्यांचे मत काय आहे याची जाणिव होते. त्या सर्वांच्या अनुमतानुसार शेवटी या लोकांनी पृथ्वीवर ताबा मिळवून त्याठिकाणी आपली वसाहत स्थापण करण्याचा निर्णय घेतलेला असतो. या सर्व व्यक्तिरेखा पाहिल्यास असे जाणवते की, अतिशय हुशार आणि पुढारलेली संस्कृती त्यांच्यामध्ये होती. हे त्यांच्या बोलण्यावरून जाणवते.

पणजोबा ही एक अभयारण्यमधील महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. आपल्या नातवंडांनी वाईट लोकांना नाही तर त्यांच्यामध्ये असणाऱ्या वाईट प्रवृत्तीला कसे संपवले पाहिजे याचे उदाहरण एका कथेतून सांगतात. या प्रवृत्ती संपल्यानंतर आपल्यामध्ये शांती आपोआप नांदेल असे पणजोबांचे मत आहे. पणजोबा या

व्यक्तिरेखेतून पृथ्वीवर शांती टिकवून ठेवणे अतिशय आवश्यक बनले आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न डॉ.नारळीकरांनी केला आहे.

पणजोबानंतर येणारी महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे कर्नल विक्रमादित्य शर्मा. मुंबई शहरावर अणुबॉम्ब पडला तर केव्हा, कुठं, किती विनाश होईल याचं चित्रण दाखविणारे आणि लोकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यासाठी मदत करणारे असे हे व्यक्तिमत्त्व आहे. याच्या माध्यमातून नारळीकरांनी लोकांच्या सुरक्षेबद्दल सरकारी यंत्रणेला किती काळजी असते हे दाखवून दिले आहे.

याशिवाय महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे पाकिस्तानचे राष्ट्रपती मियाँ नुरानी त्यांनी भारताबरोबर सलोखा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला आहे. पण त्यांच्या या प्रयत्नाला पाकिस्तानमध्ये अस्तित्वात असणाऱ्या अतिरेकी संघटनांनी विरोध केला आहे. त्यांच्या मनात भारताविषयी प्रेमाची भावना आहे. ते भारत व पाकिस्तान यांचे संबंध सुधारण्याच्या प्रयत्नात आहेत आणि म्हणून ते म्हणतात, "मी आज एक महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. भारताच्या पंतप्रधानांशी माझं त्याबद्दल बोलणं झालं आहे आणि मी घेणार असलेल्या सौहार्दाच्या निर्णयाला तसाच प्रतिसाद उदया त्यांच्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून देण्याचं त्यांनी मान्य केलं आहे......"[२६] (अभयारण्य, पृ.८०.) यावरून त्यांच्यामध्ये शांतीचा दूत म्हणून काम करण्याची भावना दिसून येते. त्यांच्यातील हा गुण देशासाठी अतिशय महत्त्वाचा आहे.

अतिरेकी संघटनेचा अध्यक्ष घियासुद्दीन ही आणखीन एक व्यक्तिरेखा. त्याने नुरानींच्या म्हणण्याला पूर्ण विरोध केला आहे. भारतासमोर त्याने काही अटी ठेवल्या आहेत. त्या अटी भारताने मान्य केल्या नाहीत तर भारतीय लोकांना मोठया संकंटाला सामोरे जावे लागेल अशी धमकी त्याने दिली आहे. भारतातील दहा शहरांवर तो हल्ला करणार असतो. त्याला वाटाघाटीमध्ये अडकवणून ठेवण्याचा प्रयत्न करणारे कृपाल शर्मा. यांच्या योजनेवरही तो पाणी फिरवतो. त्याला त्याच्या हस्तांकामार्फत कृपाल शर्मांची योजना समजते. तो भारतावर हल्ल्याचा आदेश देतो. पण त्याचवेळी पृथ्वीवरील सर्व देशांचे अण्वस्त्र साठे निकामी केलेले असतात. पृथ्वीवर पूर्ण शांतता नांदावी म्हणून ही योजना तयार केलेली असते. ही योजना तयार करणारेही हे दोघेजण असतात.

अशाप्रकारे, अनेक लहानमोठ्या व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत. वेळोवेळी अनेक पात्रे कादंबरीत आलेली आपल्याला दिसतात. पृथ्वीवर चाललेल्या प्रगतीचा पूर्ण आढावा आपल्याला यातून दिसतो. या सर्व व्यक्तिरेखा या दमनक आणि करटक यांच्या सभोवताली फिरताना दिसतात. या सर्व व्यक्तिंचा विचार या दोघांनी केलेला आपल्याला दिसून येतो. या सर्व पात्रांमुळे कादंबरीत सजिवत्व आलेले आहे.

अशारीतीने या कादंबरीतील व्यक्तिरेखांचे विश्लेषण करता येते. अनेक व्यक्तिरेखा या ठिकाणी आलेल्या आहेत. या सर्व व्यक्तींचा संबंध एकमेकांशी जोडलेला आपल्याला दिसून येतो.

**३.७ 'प्रेषित' व 'अभयारण्य' कादंबऱ्यांच्या आशयाचे वेगळेपण**

**१. 'प्रेषित' कादंबरीच्या आशयाचे वेगळेपण**

'प्रेषित' या कादंबरीच्या केंद्रभागी असलेल्या 'सायक्लॉप्स' हा सध्या प्रकल्परूपाने शास्त्रज्ञांच्या विचाराधीन आहे. 'पृथ्वीपलिकडे जीवसृष्टी प्रगत स्वरूपात असेल का' या मोठ्या प्रश्नांची शहानिशा करण्यासाठी या प्रचंड दुर्बिणीची कल्पना व्हूजेट पॅकार्ड कंपनीतील बर्नर्ड ऑलिव्हर यांच्या डोक्यातून निघाली. मोठी राष्ट्रे राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली शस्त्रावर दरवर्षी जितका पैसा खर्च करतात त्याच्या अल्पांशात सायक्लॉप्स बांधून होईल, परंतु पैशाच्या अभावी हा प्रकल्प कागदावरच आहे. जयंत नारळीकरांनी भविष्याचा वेध घेत सॉयक्लॉप्सचे काम पूर्ण केले आहे, अशी कल्पना करून कादंबरीचे लेखन केले आहे. या कादंबरीची सुरूवातच सायक्लॉप्सपासून होते व शेवटही सायक्लॉप्सजवळच होतो. नारळीकरांनी या कादंबरीची रचना वीस प्रकरणामध्ये केलेली आहे.

सर्वच विज्ञान कादंबरीकारांना अवकाशाचे वेड सुटलेले नाही. त्यांनी अवकाशामध्ये दुसरी मानवी वसाहत असण्याची शक्यता वर्तवली आहे आणि हाच मुद्दा डोळ्यासमोर ठेऊन नारळीकरांनी 'प्रेषित' या विज्ञानकादंबरीला जन्म दिलेला आहे.

परग्रहावर मानवी वसाहत असण्याची शक्यता व्यक्त करून आपल्या कल्पक प्रतिभेच्या सहाय्याने त्या ठिकाणच्या मानवी संस्कृतीचे चित्रण करून त्यांचा पृथ्वीवरील मानवाशी होणारं मित्रत्व उघड करून देण्याचा सुंदर प्रयत्न या कादंबरीत केलेला आहे.

कादंबरीची सुरूवात ही सायक्लॉपप्स या दुर्बिणीपासून होते. या सायक्लॉपप्स सारख्या वेधयंत्राचा वापर करून जॉन प्रिंगल या शास्त्रज्ञाने पृथ्वीपासून दूर अंतराळात एखादी जीवसृष्टी अस्तित्वात आहे का याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्याला त्याच्या या कामात त्याचा एक मित्र पीटर मदत करत असतो. हे दोघे मिळून सायक्लॉपप्सवरून बेकायदेशीरपणे अंतराळात अनेक संदेश पाठवण्याचे काम करत असतात. त्यातून त्यांना परग्रहावर एखादी नवीन जीवसृष्टी अस्तित्वात आहे का हे पाहयचे असते. पण दुर्दैवाने ज्या दिवशी जॉनला या परग्रहावरील जीवसृष्टीविषयी माहिती मिळते. त्याच रात्री त्याचा अपघात होतो आणि त्याचा मृत्यू होतो. आपल्याला मिळालेली माहिती पीटरला देण्यापूर्वीच तो मृत्यूमुखी पडतो. त्याचदिवशी सायक्लॉपप्सच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनाही जॉन काहीतरी बेकायदेशीर काम करत आहे याची खात्री होते. त्यामुळे त्याने शोधलेली सृष्टी आणि त्याच्याविषयीची माहिती ही अर्धवट अवस्थेत राहते. पण पृथ्वीवरून संदेश पाठवण्याचे काम पूर्ण झालेले असते. त्या संदेशाच्या उत्तरार्थ तिथून एक यान निघालेले असते. ही गोष्ट पृथ्वीवर कोणालाही माहित नसते.

विज्ञान कादंबरीकारांना कथेसाठी अवकाशाच्या रूपाने मोकळे रान मिळाले आहे. उदा. पृथ्वीबाहेरच्या विश्वाच्या अफाट पसाऱ्यात इतरत्र सजीव बुध्दिमान प्राण्याचे अस्तित्व असणारच. 'अनंतकोटी ब्रम्हांडनायक' ही परमेश्वराची बिरूदावली यातूनच सुचली. आज विश्वाच्या अफाट पसाऱ्यात अनेक आकाशगंगा आहेत. हे सप्रमाण सिध्द झाले आहे आणि ज्याप्रमाणे आपल्या आकाशगंगेत एक सूर्य असून त्याभोवती ग्रहमाला व पृथ्वीसारखा वैशिष्टपूर्ण ग्रह आहे. त्याप्रमाणे इतर आकाशगंगेमध्येही अशा तऱ्हेची वैश्विक रचना असण्याची शक्यता आहे. इतकचं कशाला आपल्या आकाशगंगेतही आणखी एक सूर्य ग्रहमाला आणि दुसरी पृथ्वी असण्याची शक्यता आहे, या विचाराने त्याला घेऊन कित्येक साहित्यप्रकारांना खादय पुरविले आहे. या सजीवांच्या भेटीसाठी

आपण अवकाशात दूरवर जायला हवं किंवा त्यांनी आपल्या भेटीसाठी यायला हवं यासाठी सैध्दांतिक दृष्टया शक्य असलेल्या गोष्टीला विज्ञानकादंबरीकारांनी वेठीस धरून कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत. याचाच आधार याठिकाणी जयंत नारळीकरांनी घेतलेला दिसून येतो. म्हणूनच सर्वसामान्य कादंबरीच्या आशयापेक्षा या कादंबरीच्या आशयाला वेगळेपण आलेले दिसून येते.

कादंबरीची सुरूवात झाल्यानंतर सुरूवातीला पाठविलेला संदेशाचे प्रत्युत्तर म्हणून आलेले एक लहान मूल पुढे काही वर्षांनी सातारा ते कराड नॅशनल हायवेवरती सुधाकर नाईक या दांपत्यास बेवारस स्थितीत सापडते. या मुलाची वैद्यकीय तपासणी करून नाईक दांपत्य त्याला कायदेशीर दत्तक घेते. त्यांना स्वत:चे मूल नसते. या मुलाचे नाव आलोक ठेवले जाते. याला तपासणाऱ्या डॉक्टरांचे मत असते की, पृथ्वीवर एवढया अचाट बुध्दिमत्तेचे बालक प्रथमच पाहण्यात आले आहे. आलोक आपल्या या अचाट बुध्दीमत्तेमुळे आपल्या पालकांना नेहमीच आश्चर्यचकित करीत असतो.

नारळीकरांनी परग्रहावरील संस्कृती किती प्रगत असणार आहे हे कल्पनेने याठिकाणी सांगितले आहे. आलोकबद्दल आपले विधान मांडताना डॉ. साळुंखे सुधारकला सांगतात, "आलोकचं आताचं वय चार महिन्यांच्या आसपास आहे हे त्याच्या शारीरिक वाढीवरून मी सांगू शकतो. माझा अंदाज फार तर एका आठवडयानं चुकू शकेल. पण त्याच्या मेंदूची एकंदर कार्यक्षमता पाहिली तर ती दोन वर्षांच्या मुलाच्या मेंदूसारखी आहे. तो बोलत नाही अजून, पण त्याचे कान विलक्षण आहेत. अगदी मंद आवाज त्याला ऐकू येतो. त्याचं नाक वास घेण्यात तीक्ष्ण आहे. पण त्याहूनही प्रभावी आहेत त्याचे डोळे. तुम्हांला विश्वास बसणार नाही, पण त्याला रंग ओळखता येतात! इतकंच नव्हे तर महिन्याभरात तो अक्षरं ओळखू शकेल......"[२७] (प्रेषित,पृ.२३.) यावरून आपल्या या विधानातील वृत्तीचाही वेध नारळीकरांनी याठिकाणी घेतलेला दिसून येतो.

आलोक जेव्हा पाच वर्षांचा झाला तेव्हा साल होते २०३०. त्यावेळी शाळा म्हणजे घरबसल्या असे. दहा लाख मुले या शाळेत शिकत होती. पहिल्याच दिवशी गुरूजींनी घातलेले उदाहरण कमी वेळात आणि एकट्या आलोकने सोडवून मिश्राजींचे मन जिंकले होते. त्या दिवसापासून मिश्राजींची आलोकवर जास्त नजर असे. मिश्राजी त्याला वेळोवेळी

वेगवेगळे प्रश्न देऊन त्याच्या बुध्दिला चालना देण्याचे काम करत. पुढे वयाच्या दहाव्या वर्षी वर्ल्ड टॅलेंट स्कीम परीक्षेत आलोकला यश मिळते व तो चंद्रावर ट्रीपला जातो. तिथे गेल्यावर त्याला वेगळे असे काही जाणवत नाही. तिथे सॅड्रा नावाच्या मुलीबरोबर त्याची मैत्री होते.

पुढे आलोकला सर्वांच्या मताने स्पेस ॲकडमीत पाठविले जाते. स्पेस ॲकडमीतही आलोक पहिल्याच दिवशी सर्वांना हैराण करतो. त्याच्यानंतर काही दिवसांनी सॅड्राला आलोक विशिष्ट अशा स्वप्नात गुंतलेला दिसतो. आपला हा अनुभव ती चेंगला सांगते. त्यावरून चेंग डॉ. साळुंखेंना भेटतो. साळुंखे चेंग व सॅड्राची मदत घेतात व आलोक हा जॉन प्रिंगलनी पाठवलेल्या संदेशाच्या उत्तरार्थ आलेल्या यानातील एकमेव परग्रहवासी असतो. हे सिध्द होते. जयंत नारळीकरांनी आपल्या या कादंबरीत परग्रहावरील मानवी वसाहतीला दुजोरा देऊन त्यांच्या प्रगत संस्कृतीचा पृथ्वीवरील मानवांसाठी उपयोग करून घेतलेला आहे. आलोक परग्रहवासी आहे, हे सिध्द होते. त्यावेळेपासून सर्वजण त्याच्यावर नजर ठेवून असतात. आलोक एकटाच काहीतरी विशेष काम करीत आहे आणि त्यासाठी तो सॉयक्लॉप्सचा वापर करत आहे, ही गोष्ट सॅड्राच्या लक्षात येते. त्यामुळे ती त्याच्या मागावर राहते. ती सर पीटर यांना भेटते. त्यांच्यामध्ये आणि आलोकमध्ये कोणते बोलणे झाले याविषयी चर्चा करते आणि पीटर यांना सांगते. तुमच्या मित्राने कदाचित परग्रहावर संदेश पाठवला असावा व त्या संदेशाचे प्रत्युत्तर म्हणून आलोक हा पृथ्वीवर आला असावा. असा अंदाज आहे. त्यामुळे ती दोघे आलोक कोणत्या ठिकाणी गेला असेल याचा अंदाज करत सॉयक्लॉप्सवर जातात. त्याठिकाणी आलोक अगोदरच पाहोचलेला असतो. आपले काम पूर्ण करण्याच्या तयारीत असतो. यानंतर कादंबरीला एक वेगळे वळण लागते. आतापर्यंत फक्त अंदाज दर्शविलेले असतात. याच्या पुढे मात्र कादंबरीचा खरा आशय समोर येतो. आलोक खरोखरच कोण असतो. तो पृथ्वीवर का आलेला असतो आणि त्याचे काम काय आहे, हे शेवटच्या एका प्रकरणात समोर येते. तोपर्यंत कादंबरी ही गूढ राहते. शास्त्रज्ञ हे सतत संशोधनात मग्न असतात. विज्ञानावर नजर ठेवू ते कार्यरत राहतात. सामान्यापासून अलिप्त राहतात. अशाप्रकारचे एक गुढतेचे वलय शास्त्रज्ञाभोवती निर्माण झालेले असते, हेच याठिकाणी दिसून येते. शेवटी शास्त्रज्ञ हाही एक माणूसच असतो. त्यालाही भाव-भावना, हेवे-दावे, राग-लोभ,

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मत्सर आहेत. नारळीकरांच्या या विज्ञानकादंबरीमध्ये सर पीटर या शास्त्रज्ञाच्या मानवी स्वभावाचे विविध पैलू वेगवेगळया रीतीने प्रकट झालेले दिसून येतात. सर पीटर मानवजातीच्या कल्याणासाठी शेवटी निर्णय घेतात. तो निर्णय मानवजातीच्या कल्याणाला पोषक ठरेल अशी त्यांना आशा वाटते. तो म्हणतो, "सॅन्ड्रा! सबंध मानवजातीचं भवितव्य माझ्या एकट्याच्या हाती येईल असं मला कधी वाटलं नव्हतं. पण मी लहानपणापासून जुगार खेळत आलोय....... आणि हा माझा आयुष्यातला सर्वात मोठा जुगाराचा डाव आहे. तू म्हणशील, मी आलोकच्या भुलावण्याला भुललो, त्याच्या विनवण्याला द्रवलो, आणि फसलो. मला तसं वाटत नाही. रेड इंडियन काय किंवा भारतीय राज काय, त्यांनी विज्ञानाची, तंत्रज्ञानाची किंमत ओळखली नाही आणि आपापल्या तंटयांमध्ये स्वातंत्र्य गमावलं. आजची मानवसंस्कृती विज्ञानाचं महत्त्व ओळखते. तिच्याकडून अशी चूक होणार नाही. त्या बाबतीत मी आशावादी आहे. आलोकच्या ग्रहबांधवांनी दिलेल्या दारूनं गुंग होण्यापेक्षा त्यांच्याकडचं बाळकडू मागून पिणं जास्त महत्त्वाचं आहे. आणि तसा नीरक्षीरविवेक आपल्या समाजात आहे असं मला वाटतं. म्हणून मी आलोकला आडकाठी केली नाही. "[२८] (प्रेषित,पृ.१२५,१२६.) त्यांच्या याविधानातून त्यांचा स्वत:वर असलेला विश्वास दिसून येतो.

अशाप्रकारे आलोक सायक्लॉप्सवर भराभर संदेश पाठवतो. आपल्या आयुष्यातली मुख्य जबाबदारी संपली असे त्याला वाटते आणि याठिकाणी कादंबरीचा शेवट होतो. आपल्याला कादंबरीच्या आशयामध्ये वेगळेपण जाणवते. याठिकाणी परग्रहावरचा मानव पृथ्वीवर येवून राहतो याची जाणीव कोणालाही होत नाही. त्याच्या आईवडिलांनाही नाही. फार थोडया लोकांना अथक अभ्यासानंतर त्याचे हे सत्य दिसून येते. पण तो मात्र आपले काम निश्चयाने पूर्ण करतो. आपल्या ग्रहावरील लोकांनी त्याच्यावर सोपवलेली जबाबदारी तो पूर्ण करतो. यातून परग्रहावरील लोकांमध्ये असणारी कर्तव्यनिष्ठा दिसून येते. अशी ही कादंबरी मनाला चटका लावून जाते. आलोकचे लोक पृथ्वीवर येवून मानवाशी मैत्री करतील की शत्रुत्व? हा प्रश्न मनात निर्माण करून जाते.

## २. 'अभयारण्य' या कादंबरीच्या आशयाचे वेगळेपण

पृथ्वी हे जीवसृष्टी नांदवणारे एकच स्थान आजवर आपल्याला माहित आहे. उदयापरवा किंवा नव्या सहस्त्रकात आणखी काही शतके उलटल्यावर विश्वात आपण एकटे नाही असा पुरावा मानवांना मिळेलही, पण तोपर्यंत तरी 'एकमेवाव्दितीयत्वा'चे समाधान आपण अनुभवू शकतो. समाधानापाठोपाठ जबाबदारी पण येतेच - हे एकुलते एक स्थान टिकवण्याची. 'बहुरत्ना वसुंधरा' हे पृथ्वीचे वर्णन खूप काही सांगून जाते. ही रत्ने केवळ सोने, हिरे, मोती यांच्या स्वरूपात नसून जीवसृष्टीला पोषक अशा पर्यावरणाच्या रूपात पाहिली पाहिजेत. सूर्याभोवती फिरणाऱ्या नवग्रहांत एकट्या पृथ्वीला ही देणगी मिळालेली आहे. विविध अंतराळयानांनी इतर ग्रहांची आणलेली माहिती काय दर्शवते? आपल्यासारखी जीवसृष्टी नांदवू शकणारे वातावरण त्यांच्याकडे नाही. अभयारण्य या कादंबरीत ही 'बहुरत्ना वसुंधरा' सांभाळण्या दृष्टीने पृथ्वीवरील लोकांनी काय केले पाहिजे हे सूचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परग्रहावरून दमनक आणि करटक हे दोन निरिक्षक पृथ्वीवर येतातच. येथून या कादंबरीची सुरूवात होते. या दोघांपासून कादंबरीची सुरूवात होते आणि शेवटही या दोघांपाशीच होतो. नारळीकरांनी या कादंबरीची रचना एकोणीस प्रकरणामध्ये केलेली आहे.

जयंत नारळीकरांनी सर्वसामान्य कादंबरीच्या आशयापेक्षा प्रेषित प्रमाणेच या कादंबरीच्या आशयाला वेगळेपण आलेले दिसून येते.

सुरूवातीच्या प्रकरणात मानवाच्या सर्वात महत्त्वाच्या शोधाचे वर्णन येते. टंबू आगीला शोधून आणतो. त्यानंतर कादंबरीमध्ये प्रत्येक प्रकरणात मानवाच्या प्रत्येक प्रगतीचा आढावा घेतलेला आहे. परग्रहावर मानवी वसाहत असण्याची शक्यता व्यक्त करून आपल्या कल्पक प्रतिभेच्या सहाय्याने त्या ठिकाणच्या मानवी संस्कृतीचे चित्रण करून त्यांचा पृथ्वीवरील मानवाशी होणारे मित्रत्व उघड करून देण्याचा प्रयत्न या कादंबरीत केलेला आहे. त्याचबरोबर हे परग्रहवासी पृथ्वीला वाचविण्यासाठी मानवाची कशाप्रकारे मदत करतात हे एकेका प्रकरणातून नारळीकरांनी दाखवून दिलेले आहे. एके ठिकाणी ते म्हणतात, "नावेत मनूने घेतलेले आप्तस्वकीय आणि इतर प्राणी पूर ओसरण्याची वाट पाहत होते. इथपर्यंत आकाशवाणी खरी ठरली, तेव्हा तिने सुचवलेला

उपाय आपल्याला खचितच तारक ठरेल असा मनूचा विश्वास होता."[२९] (अभयारण्य, पृ. १३) अशाप्रकारची अनेक उदाहरणे आपल्याला या कादंबरीत आलेली दिसतात.

लोक प्रगती तर करत असतात पण त्यातून होणाऱ्या दृष्परिणामांचा विचार याठिकाणी केला जात नाही. याची जाणीव प्रत्येक प्रकरणातून नारळीकर करून देताना दिसतात. कादंबरी ही काल्पनिकेतेवर आधारित असूनही तिला सत्याची किनार असते. त्याचप्रमाणे अभयारण्य या कादंबरीतही बऱ्याच सत्यघटनांचा आधार घेतलेला आहे. मानवाने आपल्या बुध्दिच्या जोरावर लावलेल्या विविध शोधांचे वर्णन याठिकाणी नारळीकरांनी केलेले आहे. त्यांनी या शोधाच्या माध्यमातूनच भविष्यात निर्माण होणाऱ्या अडचणीचा आढावा घेतलेला आहे. सुखसोईच्या सवयीच्या अधिन जाऊन मानव स्वत:च स्वत:वर संकंट ओढवून घेत आहे. अशा प्रकारच्या आशयाने कादंबरीला जिवंतपणा आलेला आहे. कादंबरीत घडणाऱ्या सर्व घटना आपल्या डोळयासमोर घडत आहेत असे आपल्याला जाणवते. "आपण इतिहास पाहिला की दिसून येतं की, वैज्ञानिक शोधांचा उपयोग ज्याप्रमाणं मानवाच्या कल्याणासाठी केला जातो त्याप्रमाणंच संकुचित स्वार्थ साधण्यासाठी पण केला जातो आणि अशा वेळी मानवकल्याणाचा हेतू धाब्यावर बसवला जातो."[30] (अभयारण्य, पृ.४४.) अशाप्रकारचा आशय आपल्याला वारंवार येताना दिसतो. त्यातून नारळीकरांनी लोकांना सावध करण्याचा आपला उद्देश साधलेला दिसतो. नारळीकरांनी एकाच कादंबरीत अनेक गोष्टींना एकत्र आणण्याचा प्रयत्न केलेला आपल्याला दिसून येतो.

तंत्रज्ञानाच्या अयोग्य वापराचा दुष्परिणाम तर त्यांनी दाखविला आहेच पण त्याचाबरोबर त्यांनी नैसर्गिक साधनसंपत्तीचा होणारा ऱ्हास याच्याकडेही वाचकांचे लक्ष वेधले आहे. कादंबरीच्या एका प्रकरणात आपल्याला निर्सगाचा समतोल कसा बिघडतोय हेही गोष्टीरूपाने सांगितले आहे. त्यावेळी निर्सगाची मानवाकडून होणारी हानी किती प्रचंड होती. त्यामुळे मानवाला भविष्यात किती संकटांना सामोरे जावे लागते याची उदाहरणे दिलेली आहेत. "होय बाबा! टसतात काही दृष्ट अन् स्वार्थी माणसं. त्यांना पैशाशिवाय काही सुचत नाही. पण त्या काळी जंगलांना, त्यांतील झाडांना, पशुपक्ष्यांना जपावं ही जाण मानवात हवी तितकी नव्हती. म्हणून जंगलाचं रक्षण करायला,

त्यांच्यावर लक्ष ठेवायला वनरक्षक असायचे. मी असाच एक वनरक्षक होतो. मला जंगलं आवडायची म्हणून त्यांची निगा राखायला वनरक्षकाची नोकरी मी पत्करली."[३१] (अभयारण्य, पृ.६१.) याठिकाणी आपल्याला दिसून येते. माणूस पैशासाठी किती टोकाची भूमिका घेऊ शकतो. या कादंबरीच्या आशयात आपल्याला विविधता दिसून येते. नारळीकर एके ठिकाणी आपल्याला मानवाला लागलेल्या शोधाबद्दल अभिमानाने माहिती देतात तर दुसऱ्या ठिकाणी त्याच्या गैरवापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीवही करून देतात. निसर्गाचा समतोल कशाप्रकारे साधला पाहिजे हे सांगतात. त्याचबरोबर लगेच परग्रहावरील जीवसृष्टीपासून मानवाला धोका असू शकतो असेही दाखवतात तर कधी याच लोकांकडून पृथ्वीचे संरक्षण केलं जातयं असा आशय दर्शवतात. पण तरीही कांदबरीत कोठेही तुटकपणा येत नाही. उलट सर्व प्रकरणे एकमेकांशी संबंधित अशीच राहतात. कादंबरीच्या सुरूवातीपासून शेवटपर्यंत घडणाऱ्या सर्व घटना एकमेकांशी बांधल्या गेल्या आहेत असे दिसून येते. त्यामुळेच कादंबरीच्या आशयाचे वेगळेपण जाणवते.

आजची मराठी विज्ञान कादंबरी प्रामुख्याने अवकाश, परग्रह, अंतराळप्रवास, परग्रहवासी या विषयाभोवती रेंगाळणारी असली, तरी या कादंबरीतील कल्पनासृष्टी ही विविधतापूर्ण आणि आकर्षक आहे. अवकाशप्रवास आणि परग्रहवासी यांच्याबद्दल नानाप्रकारच्या कल्पना मराठी विज्ञानकादंबरीत आढळतात. त्याचप्रमाणे 'कालप्रवासाचे' कल्पनाचित्रणही मराठी विज्ञान कादंबरीत आढळते. कालप्रवास म्हणजे एका काळातून दुसऱ्या काळात जाणे.'कालप्रवास' हा विज्ञानकादंबरीकारांचा एक आवडता विषय आहे.

कालप्रवासाची कल्पना वैज्ञानिक कसोटीवर उतरत नसली तरी या प्रकारच्या आशयाच्या कादंबऱ्या मात्र विपुल आहेत. यामध्ये प्रामुख्याने पाश्चिमात्य विज्ञानकादंबरीकारांनी कालप्रवासाच्या कादंबरी विपूल प्रमाणात लिहिल्या आहेत. विशेषत: वेल्स यांनी कालयंत्राच्या सहाय्याने कालप्रवास नियंत्रित केला आणि या यंत्राच्या माध्यमातून अनेक लेखकांची कल्पनाशक्ती भूत व भविष्यकाळात मुक्त विहार करु लागली. नारळीकरांनी कालप्रवासाचा आधार घेतलेला दिसतो. कादंबरीचा आशय पाहिल्यानंतर आपल्याला असे दिसून येते की, भूतकाळापासून ते भविष्यापर्यंत संपूर्ण

काळाचा आढावा त्यांनी घेतलेला आहे. आदिमानवापासून सुरु करून कादंबरी २०७२ साली संपते. याचा अर्थ भविष्याचे अफाट असे वर्णन याठिकाणी आलेले आहे. भविष्यात येणाऱ्या संकटांचा आढावा त्याच आधारे घेतलेला आहे. असे असले तरी आजच्या परिस्थितीचा अभ्यास करून तंत्रज्ञानाच्या वाढता उपयोग आणि वाढती लोकसंख्या यांचा अभ्यास करून त्यामुळे भविष्यातील संकटांचा आढावा घेतलेला दिसून येतो. म्हणूनच कादंबरीला वास्तवतेची किनार लाभलेली आहे असे दिसून येते.

## ३.६ निष्कर्ष

१. 'प्रेषित' या कादंबरीची रचना सर्वसामान्य कादंबरीपेक्षा वेगळया वळणाची दिसून येते.

२. 'प्रेषित' या कादंबरीच्या रचनेत विज्ञान प्रत्येक ठिकाणी दिसून येते.

३. 'प्रेषित' या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे कादंबरीची गुणवत्ता वाढविताना दिसतात.

४. 'प्रेषित' या कादंबरीतील व्यक्तिरेखा या शहरी भागातील जीवन जगणाऱ्या असल्यामुळे त्यांच्या संवादाची भाषा ही उच्चभ्रू आहे.

५. 'प्रेषित' या कादंबरीतील व्यक्तिरेखा यांचे आपल्या कामावर व संशोधनावर प्रेम असलेले दिसत आहे.

६. 'प्रेषित' या कादंबरीतील व्यक्ती या श्रीमंत आहेत. तरीही त्यांच्याठिकाणी संस्कारशीलता, एकमेंकाचा आदर करण्याची वृत्ती दिसून येते.

७. 'प्रेषित' या कादंबरीतील व्यक्तिरेखा या उच्च शिक्षीत आहेत. तरीही एकमेंकांच्या कामाबद्दल त्यांना आस्था असलेली दिसून येते.

८. आलोकला आपल्या कर्तव्याची पूर्णपणे जाणीव आहे. तो आपले कर्तव्य अनेक प्रयत्न करून पूर्ण करतो. यातून त्याची चिकाटी दिसून येते.

९. अनेक प्रसंगातून आलोकच्या अलौकिक बुध्दिमत्तेचा साक्षात्कार झालेल्या दिसून येतो.

१०. आलोक, सॅन्ड्रा, चेंग यांच्यामध्ये एकमेकांना पूर्णपणे सहकार्य करण्याची वृत्ती दिसून येते.

११. प्रत्येक पात्राचे ज्ञान आणि अभ्यास सात्यत्यपूर्ण असल्याचे दिसून येते.

१२ 'प्रेषित' या कादंबरीचा आशय सर्वसामान्य कादंबरीतील आशयाप्रमाणेच दिसतो मात्र त्याचा अंतरंग खूप काही शिकवून जाताना आपल्याला दिसून येते.

१३ 'अभयारण्य' या कादंबरीची रचना सर्वसामान्य कादंबरीपेक्षा वेगळया वळणाची दिसून येते.

१४ 'अभयारण्य'या कादंबरीच्या रचनेत विज्ञान प्रत्येक ठिकाणी दिसून येते.

१५ 'अभयारण्य'या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे कादंबरीची गुणवत्ता वाढविताना दिसतात.

१६ 'अभयारण्य'या कादंबरीतील व्यक्तिरेखा या शहरी भागातील जीवन जगणाऱ्या असल्यामुळे त्यांच्या संवादाची भाषा ही उच्चभ्रू आहे.

१७ 'अभयारण्य'या कादंबरीतील व्यक्ती या श्रीमंत आहेत. तरीही त्यांच्याठिकाणी संस्कारशीलता, एकमेंकाचा आदर करण्याची वृत्ती दिसून येते.

१८ प्रत्येक पात्राचे ज्ञान आणि अभ्यास सात्यत्यपूर्ण असल्याचे दिसून येते.

१९ 'अभयारण्य' या कादंबरीचा आशय सर्वसामान्य कादंबरीतील आशयाप्रमाणेच दिसतो पण त्याचे अंतरंग खूप काही शिकवून जाताना दिसून येतात.

२० 'अभयारण्य' या कादंबरीतून भविष्याचा विचार अतिशय चांगल्या प्रकारे केलेला दिसून येतो.

२१ 'अभयारण्य' या कादंबरीत नारळीकरांनी अवकाश प्रवासात आपल्या कल्पकतेच्या जोरावर विज्ञानाला धरून वाचकप्रिय लेखन केलेले असले तरी त्यामध्ये कोठेही कृत्रिमता येत नाही.

२२ 'अभयारण्य' या कादंबरीत भारतीय संस्कार आणि संस्कृती यांची मानवी मनावर जडणघडण होत असताना त्याचे गडद ठसे उमटलेले दिसतात.

## ३.७ समारोप

'प्रेषित आणि अभयारण्य' या कादंबरीचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत कादंबरीच्या आशयाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. कादंबरीतील सर्व घटना प्रसंग, त्याचबरोबर व्यक्तिरेखा यांचे स्वरूप माहिती समजण्यासाठी आशय मांडणे महत्त्वाचे ठरते. म्हणून प्रस्तुत प्रकरणात या कादंबरींच्या आशयाचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. अंतराळ प्रवास, संगणक हे विज्ञानकादंबरीकारांचे महत्त्वाचे विषय असले तरी विज्ञान कादंबरीचे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

क्षेत्र काही एवढ्यापुरते मर्यादित नाही. विज्ञानाने आपल्या रोजच्या जीवनातही खूप बदल घडवून आणले आहेत तर आणखी कित्येक बदलांची नांदी आज ऐकू येतेय. यातले काही सुखकर आहेत, तर काही भयंकर आहेत. सुधारलेले राहणीमान, वैद्यकीय सोयी, दळणवळणाची साधने, यामुळे एकीकडे मानवी जीवन सुखी होतयं, तर दुसरीकडे पर्यावरणाचा ऱ्हास, अणुयुध्दांची टांगती तलवार यामुळे मानवी जीवन अस्थिर झालेले दिसते.

एवढे मात्र खरे उदयाचे जग कसे असेल याची एक झलक मात्र आपल्याला 'प्रेषित आणि अभयारण्य' या विज्ञान कादंबरीमधून पाहायला मिळते.

## ३.८ संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | नारळीकर, जयंत | : | यक्षांची देणगी, मौज प्रकाशन, आठवी आवृत्ती, २००९. पृ. क्र.१०. |
| २. | नारळीकर, जयंत | : | प्रेषित, मौज प्रकाशन, पाचवी आवृत्ती, पृ. ४२. |
| ३. | तत्रैव | : | पृ. २३. |
| ४. | तत्रैव | : | पृ. १२४. |
| ५. | नारळीकर, जयंत | : | अभयारण्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. २. |
| ६. | तत्रैव | : | पृ. २. |
| ७. | जावडेकर, शं. द. | : | मराठी साहित्य संमेलन - अध्यक्षीय भाषणे, हीरक महोत्सव प्रकाशन, पृ. क्र. १२६. |
| ८. | नारळीकर, जयंत | : | प्रेषित, मौज प्रकाशन, पाचवी आवृत्ती, पृ. १२२. |
| ९. | नारळीकर, जयंत | : | अभयारण्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. ४. |
| १०. | तत्रैव | : | पृ. ६७. |
| ११. | नारळीकर, जयंत | : | प्रेषित, मौज प्रकाशन, पाचवी आवृत्ती, पृ. १९. |
| १२. | तत्रैव | : | पृ. २१. |
| १३. | तत्रैव | : | पृ. ५६. |
| १४. | तत्रैव | : | पृ. ७६. |
| १५. | तत्रैव | : | पृ. १२५. |
| १६. | तत्रैव | : | पृ. ६०. |
| १७. | तत्रैव | : | पृ. ८२. |
| १८. | तत्रैव | : | पृ. १६. |
| १९. | तत्रैव | : | पृ. १२५,१२६. |
| २०. | तत्रैव | : | पृ. २५. |

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | नारळीकर, जयंत | : | अभयारण्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. २३. |
| २२. | तत्रैव | : | पृ. ३६. |
| २३. | तत्रैव | : | पृ. ९. |
| २४. | तत्रैव | : | पृ. ३१. |
| २५. | तत्रैव | : | पृ. ५३. |
| २६. | तत्रैव | : | पृ. ८०. |
| २७. | नारळीकर, जयंत | : | प्रेषित, मौज प्रकाशन, पाचवी आवृत्ती,पृ. २३. |
| २८. | तत्रैव | : | पृ. १२५,१२६. |
| २९. | नारळीकर, जयंत | : | अभयारण्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. १३. |
| ३०. | तत्रैव | : | पृ.४४. |
| ३१. | तत्रैव | : | पृ.६१. |